| 12 | DILSHAD BEGUM DARE SAHEB | O010036783003 | 084300 | 18/03/15 | 23548 |
| 13 | CHANDRAKANT R.SWAMI | O010028952001 | 106125 | 30/03/15 | 10602 |
| 14 | NISHA C.SHAHU | O020034369166 | 000073 | 30/03/15 | 1857 |
| 15 | CHANDRAKANT G.PARMAR | O020035434545 | 548678 | 27/1/15 | 38792 |
| | | | | **Total** | **1,91,408** |

**आक्षेप क्र १.१७:- HDFC बँक मालमत्ता कर खाते क्र.५०२००००४३५४२२५ चे ७६० धनादेश परत आल्याबाबत.**

मालमत्ता कर प्रणाली व्दारे वसुली करण्यात येत असुन ०१/०४/२०१४ ते २८/०९/२०१४ पर्यंत जमा झालेला मालमत्ता कर लेखा विभागात रोख रक्कम व धनादेशाद्वारे कर विभागातुन भरणा करण्यात येत होता. दि.२९/०९/२०१४ पासुन महानगरपालिकेने मालमत्ता करासाठी HDFC बँकेमध्ये स्वतंत्र खाते नं-५०२००००४३५४२२५ काढले असुन सदरील खात्यात जमा रक्कम कर वसुली विभागाद्वारे परस्पर रोख रक्कम व धनादेश जमा करण्यात येतो.

सदर खात्याची जमा रक्कमेची यादी (संगणक प्राप्त) तपासताना आढळुन आले की ७६० धनादेश रक्कम रु.२,१३,५६,१६२.१८ निरनिराळ्या कारणासाठी बँकेने परत केली आहे. परंतु परत आलेल्या धनादेशाची कर विभागात धनादेश परत नोंदवही ठेवणे गरजेचे असताना तसेच धनादेश न वटल्यापरकरणी दंडासहित कराची रक्कम वसुल करणे आवश्यक आहे. सदर धनादेश न वटल्याप्रकरणी सर्वप्रथम लेजर मध्ये जाऊन फ्लॅग ‘Y’लावणे आवश्यक आहे. जेणेकरुन मालमत्ता धारकाच्या खात्यात सदर कराची रक्कम दंडासहीत थकबाकी म्हणुन दर्शविण्यात येईल. तसेच मालमत्ता धारकाविरुध्द परक्राम्यपत्र (Negotiable Instrument Act) कायद्यानुसार कलम १३८ अन्वये कारवाई केल्याबाबत

धनादेश नोंदवहीत नोंद घेणे. परंतु सदरील धनादेश नोंदवही वारंवार मागणी करुन देखील कर विभागाने ती लेखापरीक्षण विभागास सादर केली नाही . त्यामुळे परत आलेल्या धनादेशासाठी कारवाई केली की नाही हे तपासता आले नाही. ही बाब महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १०६ अनुसार गंभीर आहे.

वरील परत आलेल्या धनादेशा बाबत काय कार्यवाही केली याबाबतची माहिती तपशिल व संदर्भिय नोंदवही लेखापरीक्षणास उपलब्ध करुन खुलासा सादर करावा.

**आक्षेप क्र १.१८:- श्रीम.आरती जयप्रकाश मिश्रा (निळकंठ टॉवर) मिरारोड (पुर्व) अनियमितते बाबत....**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अभिनियम १९४९ मधील कलम २६७(अ) मधील तरतुदी नुसार अवैध इमारत किंवा इमारतीच्या अवैध भागास शास्ती आकारण्याची तरतुद आहे . प्रति चौ.मी रु.८०/- रहिवास वापरासाठी व रु.१२०/- प्रति चौ.मी वाणिज्य वापरासाठी तसेच रु.९०/- प्रति चौ.मी औद्योगिक वापरासाठी याप्रमाणे दंडाची आकारणी करावयाची आहे.

श्रीम.आरती जयप्रकाश मिश्रा (निळकंठ टॉवर) यांनी कनकिया रोड , निळकंठ टॉवर शॉप क्र.५/ए,१०८ चौ.फुटाला कराची आकारणी करुन मिळावी यासा ठी अर्ज केला आहे. (आवक क्रमांक-१७५९ दि.२९/०३/२०१४ वॉर्ड-एफ/०५)

प्रभाग कार्यालय क्र.०६ येथील मिळकत कर आकारणीच्या नोटीस वरून ही मालमत्ता सर्व्हे क्र.१५४ हि.क्र.८ मौजे नवघर या भुखंडावर असुन सदरचे बांधकाम वाढीव केलेले आहे . यामुळे सदर बांधकाम अनधिकृत असुन सदर बांधकामास १०८ चौ.फु विचारात घेउन प्रति रु.३/- प्रति चौ.फु (वाणिज्य वापारासाठी) प्रमाणे मासिक भाडे रु.३२४/- धरून दि.०१/०४/२०१२ ते दि.३१/०३/२०१४ पर्यंत रु.३/- प्रति चौ.फु. विचारात घेऊ न कर आकारणी रु .५७३३/- करण्यात आलेली आहे . तथापि मुंबई प्रांतिक महानगरपालिका अभिनियम १९४९ मधील कलम २६७ (अ) मधील तरतुदी नुसार दडांची आकारणी करण्याचे राहुन गेले आहे. त्यामुळे रु.१२०/- प्रति चौ.मी वाणिज्य वापरासाठी रक्कम विचारत घेउन (१ मी= १०.७६४ फुट, १०.०८ मी,१०.०८ मी X रु.१२०/-= रु.१२१०/-) रक्कमेच्या कराची आकारणी प्रत्येक वर्षासाठी आकारून वसूली करणे आवश्यक आहे.

वरील प्रकरणी अनुपालन अप्राप्त आहे.

**आक्षेप क्र १.१९:- एस.ए.रीयालिटी यांचा १६ जुन २०१४ यांचा कर आकारणी करणेबाबत...**

एस.ए. रीयालिटी यांचा 16 जुन 2014 यांचा अर्जावरून महानगरपलिका क्षेत्रात प्रभाग क्र.06 अंतर्गत वसुली वॉर्ड एफ झोन क्र.05 मध्ये गोडदेव स.क्र. 59 हिस्सा नं 15 या मोकळ्या जागेचे क्षेत्रफळ 610 चौ.मी. इतके आहे. या मोकळ्या जागेला कोणत्याही प्रकारचा व्यवसायीक कामाकरीता वापर केला जात नसुन सदरहुन मोकळ्या जागेवर मालमत्ता कराची आकारणी अर्ज केलेला आहे.

उपरोक्त संदर्भिय अर्जाचा अनुषंगाने वॉर्ड एफ झोन 05 चे कर निरीक्षक यांने दि.10.07.2014 रोजी पाहणी केली असता 3013 चौ.फु. क्षेत्रफळाचा वापर सार्वजनिक वापर चालू असून 3013.92 चौ.फु. रू.5.00 या प्रमाणे कर आकारणी एकुण रू.92768 इतकी करण्यात आलेली आहे.

एकुण 610 चौ.मी. जागेपैकी 280 चौ.मी. (3013.92 चौ.फु.) जागेची आकारणी करण्यात आलेली आहे.परंतु 330 चौ.मी.( 3552.12 फुट) मोकळ्या जागेवर कर आकारणी करण्यात आलेली नाही. तरी शिल्लक जागेवर का कर आकारणी करण्यात आली नाही यांचा खुलासा करण्यात यावा तसेच सार्वजनिक वापराची जागा प्रमाणीत करण्यात आलेली आहे. परंतु त्याची मोजमाप कोणत्या प्रकाराचा सार्वजनिक वापर व शिल्लक राहीलेली जागा याबाबत काही विवरण कर निरीक्षकाचा पाहणी अहवालात दर्शविण्यात आलेला नाही व यामुळे कर निरीक्षकाचा पाहणी अहवाल आक्षेपार्ह वाटतो.

वरील प्रकरणी कर आकारणी कशी काय झाली याबाबतचे अपुपालन अप्राप्त आहे.

**आक्षेप क्र १.२० :- मालमत्ता कराचे टपाल अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन देणे बाबत....**

महानगरपालिकेच्या प्रभाग क्र.०६ कार्यक्षेत्राअंतर्गत सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात दि. ०१.०४.२०१४ ते ३१.०३.१५ पर्यंत मालमत्ता कर विषयक अनुक्रमे मालमत्ता हस्तांतरण , नवीन कर आकारणी, सुधारीत निवासी / बिगर निवासी दराने कर आकारणी, किरकोळ दुरुस्ती, तसेच माहिती अधिकार इ. अर्ज आवक बारनिशी रजिस्टर मध्ये प्राप्त झालेले आहेत.

उपरोक्त कर विषयक अर्जावर कार्यालयामार्फत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल लेखापरिक्षणास सादर करण्यात आलेला नाही.

**आक्षेप क्र.१.२१:- २०१४-१५ चे मालमत्ता कर विभागाचे एकत्रित चलन व बँक स्टेटमेंट उपलब्ध करुन न दिल्याबाबत.**

कर विभागातील जमेच्या बाजुचे नोंद तपासण्यासाठी व लेखाविभागातील जमेच्या बाजुची पडताळणी करण्यासाठी एकत्रित चलने व बँक स्टेटमेंट लेखापरिक्षणाकरीता वारंवार मागुन देखील उपलब्ध करुन दिलेले नाही

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०५ (२) व अनुसुची 'ड' प्रकरण ३ दोन मधील नियम ६ (२) व ७ नुसार लेखापरीक्षणा करिता विभागाने संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे . वरील अभिलेख लेखापरी क्षणास उपलब्ध केले नाहीत व त्यामुळे सदर बाबीचे लेखापरीक्षण करता आले नाही.

**आक्षेप क्र १.२२:- भोगवटा दाखला दिलेल्या इमारतींना केलेल्या कर आकारणीची अभिलेख व माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देणेबाबत..**

सन २०१४-१५ मध्ये एकुण ५० प्रकरणात नगर रचना विभागाकाकडुन भोगवटा दाखला देण्यात आलेला आहे . दिलेल्या भोगवटा दाखल्याप्रमाणे मिळकत कर आकारणी करून मिळकतदारास बिले देणे व वसुली करणे गरजेचे आहे . वारंवार मागणी करुन देखील वरील प्रकरणे लेखापरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात आली नाहीत. त्यामुळे वरील प्रकरणांचे लेखापरीक्षण करता आले नाही.

तरी, सोबत जोडलेल्या भोगवटा दाखल्याच्या यादीप्रमाणे सर्व प्रकरणात कर आकारणी झाली असल्यास सदर प्रकरणे लेखापरीक्षणास २ दिवसात उपलब्ध करुन देणेबाबत व वरील प्रकरणातील मागणी , वसुली व थकबाकीची यादी लेखापरीक्षणास सादर करणेबाबत विभागास अर्धसमासाद्वारे कळविण्यात आले होते . मात्र वरील कोणताही अभिलेख माहिती विभागाने सादर केली नाही.

**आक्षेप क्र१.२३:- चलन पडताळणी बाबत...**

प्रभाग क्र.०६ कर विभागातील (वॉर्ड क्र.एल.के.क्यु.) किरकोळ पावती पुस्तके, पोटकिर्द व चलने पडताळणी करताना चलनाव्दारे लेखा विभागात (रोखपाल) भरणा केलेल्या रक्कमेच्या खालील चलनांवर रोखपाल यांची स्वाक्षरी, शिक्का आढळुन आली नाही.

| **दिनांक** | **रक्कम (रु.)** |
|---|---|
| ३०/०९/२०१४ | ४१३०/- |
| ०१/१०/२०१४ | ४०/- |
| ०४/१०/२०१४ | १०३०/- |
| ०७/१०/२०१४ | १०००/- |
| १३/१०/२०१४ | १०००/- |
| २१/१०/२०१४ | १५२०/- |
| २७/१०/२०१४ | १०२५/- |
| ३०/१०/२०१४ | ८०/- |
| ३१/१०/२०१४ | ७०/- |
| ०१/११/२०१४ | ७०/- |
| १८/११/२०१४ | २६०/- |
| ०९/१२/२०१४ | ४८३०/- |
| ०३/११/२०१४ | २१३०/- |
| ०५/११/२०१४ | २०४०/- |
| ०७/११/२०१४ | १२००/- |
| १०/११/२०१४ | १९०/- |
| १२/११/२०१४ | १८०/- |
| १४/११/२०१४ | ५१७०/- |
| १५/११/२०१४ | ३११०/- |
| १७/११/२०१४ | १२०२/- |
| ०८/०१/२०१५ | ८६३६/- |
| ०९/०१/२०१५ | ६५५०/- |
| १२/०१/२०१५ | ३३६५/- |
| १४/०१/२०१५ | ५०५०/- |
| १६/०१/२०१५ | ४६५०/- |
| १९/०१/२०१५ | १९,२१०/- |
| २३/०१/२०१५ | १०,४००/- |
| ३१/०१/२०१५ | १२,१३४/- |
| ०६/०२/२०१५ | ३४४२/- |

| | |
|---|---|
| ०७/०२/२०१५ | २०७३/- |
| ०२/०३/२०१५ | ३१००/- |
| ०५/०३/२०१५ | १३०८६/- |
| १६/०३/२०१५ | १४००/- |
| २४/०३/२०१६ | ३२३६/- |
| ३१/०३/२०१६ | १६४६/- |
| **एकुण** | **१,२८,२५५/-** |

तसेच वरील चलनातील नोंदी लेखा विभागातील रोकड वही शी पडताळणी केली असता आढळुन येत नाही . त्यामुळे प्रथम दर्शनी वरील चलनाची एकुण रक्कम रुपये १,२८,२५५/- महापालिकेच्या फंडात जमा न झाल्याचे दिसुन येते . सदर बाब गंभीर आहे. याबाबतचे अनुपालन अप्राप्त आहे.

# पाणी पुरवठा विभाग

**आक्षेप क्र २.१ :- पाणीपट्टी रक्कमेच्या थकबाकी बाबत...**

मार्च-२०१५ अखेर मागणी-वसुली थकबाकीचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

(रक्कम रुपयात)

| | मागील | | | चालु | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | पाणीपट्टी | उपकर | एकूण | पाणीपट्टी | उपकर | एकूण | |
| **मागणी** | २१०९०९४१ | ६९३६२६ | २१७८४५६७ | ३३८१६५०६८ | १३१८५५६ | ३३९४८३६२४ | ३६१२६८१९१ |
| **वसुली** | ११४३००९१ | ३६०६४ | ११४६६१५५ | ३३१४८१७२४ | १०२९३५१ | ३३२५११०७५ | ३४३९७७२३० |
| **थकबाकी** | ९६६०८५० | ६५७५६२ | १०३१८४१२ | ६६८३३४४ | २८९२०५ | ६९२५४९ | १७२९०९६१ |

सन २०१४-१५ मध्ये मागील मागणी रु. २,१७,८४,५६७/- इतकी होती. मार्च अखेर त्यापैकी रु.१,१४,६६,४५५/- एवढी वसुली करण्यात आली. म्हणजे ५२% टक्के मागील वसुली झाली आहे व थकबाकी रु.१,०३,१८,४१२/- (४८%) एवढी मार्च अखेर वसुली करावयाची आहे.

मागणी केलेली मागील थकबाकी ही फार जुनी असुन ती का वसुल होत नाही व त्यासाठी काय प्रयत्न केले व जर वसुली होण्यासारखी नसल्यास निर्लेखित करण्यासाठी का ठेवण्यात आले नाही याबाबतचा खुलासा लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेला नाही.

**आक्षेप क्र २.२ :- पाणी पुरवठा विभागातील देयकांमध्ये आढळलेल्या तफावती / त्रुटींबाबत...**

मिरा भाईंदर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाच्या खालील कामांचे देयक तपासले असता त्यामध्ये खालील तफावती / त्रुटी आढळुन आल्या आहेत.

**१) कामाचे नाव-** मिरा रोड (पु) शाति नगर येथे सेक्टर ११ जलकुंभ सेक्टर ४ इमारत क्र.बी/६ ते सेक्टर ५ इमारत क्र. ए/३ ते ए/१२ पर्यंत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे.

**२**) **लेखाशिर्ष** :- नवीन जलवाहिनी टाकणे.

३) **अंदाजित खर्च :-** रु.२१,३१,२००/-

४) **प्रशासकिय आर्थिक मंजूरी :-** मा. आयुक्त यांची दि.१७/०८/२०१४ रोजीची मंजूरी.

५) **तांत्रिक मंजूरी** :- मा.कार्यकारी अभियंता ,पाणी पुरवठा विभाग मि .भा.मनपा यांची क्र .४४ दि.१७/०८/२०१४ रोजीची मंजुरी.

६) **कंत्राटदाराचे नाव** :- मे. गणेश डेव्हेलोपर्स

७) **मंजूर दर :-** अंदाजपत्रकापेक्षा ४% जास्त दराने

८) **मंजूर दरानूसार अपेक्षित खर्च :-** रु.२२,१६,४४८/-

९) **कार्यादेश :-** मनपा/पा.पु./कार्या/६९/२०१४-१५ दि.१८/१२/२०१४

१०) **कामाची मुदत :-** ०६ महिने दि.१८/१२/२०१४ ते १७/०६/२०१५ पर्यंत

११) **काम पुर्ण झाल्याची तारीख :-** दि.१६/०२/२०१५

१२) **बांधकाम नोंद वही :-** ४७३/९५ ते १०० व ९२६/५३ ते ५४

१३) **देयक ४% जास्त दराने:-** रु.२३,१८,२६५/-

वरील कामांची बांधकाम नोंदवही तपासली असता Ite, no.01 प्रमाणे Excavation fpr foundation /pipe trenche in soft rocks & old cement & lime masonry foundation etc. Complete.

| Length | | Width | | Depth | | CMT |
|---|---|---|---|---|---|---|
| 22.00 | X | 0.80 | X | 1.00 | = | 17.60 M |
| 27.00 | X | 0.80 | X | 1.00 | = | 21.60 M |
| 30.00 | X | 0.80 | X | 0.70 | = | 16.80 M |
| 25.00 | X | 0.80 | X | 0.70 | = | 14.00 M |
| 333.00 | X | 0.80 | X | 0.70 | = | 186.48 M |
| 15.00 | X | 0.80 | X | 0.70 | = | 08.40M |
| 18.00 | X | 0.80 | X | 0.70 | = | 10.05 M |
| 470.00 RMT | | | | | | 274.96 |

Item No.20 प्रमाणे Providing & Supplying ISI mark C.I. pipes of following class & dia etc. Complete.200mm= 332 RMT

वरिल प्रमाणे 332 RMT जलवाहिनी अंथरावयाची असल्याने 470 RMT Excavation ची काय गरज होती. ? त्यामुळे १३८ RMT Excavation जास्तीचे झाले आहे असे वाटते व त्यामुळे ८०.७३ घन मीटर १४७.४० रु.११९००/- इतकी रक्कम आक्षेपाधीन आहे.

Item No.20 प्रमाणे जर २००mm जलवाहिनी ३३२ अंथरावयाची होती तर item no-11 प्रमाणे Providing & Supplying ISI Standard MS Specail of required thickness with 3 coats of approved... etc.complete. याप्रमाणे ७२२६.७५ किलोग्रॅम MS special वापरले.

२०० मी.मी चे ३३२ मी. पाईप अंथरण्यात आले असुन Item No.11 (MB773 Page 98) 10X3.14X0.208X7880X0.007 = 358.88 किलोग्रॅम MS special वापरण्यात आले. त्यामुळे ६८६७.८७ किलोग्रॅम MS special जास्तीचे वापरले असे वाटते. तसेच त्यावरील परवणे व अंथरणे सह सर्व खर्च जास्त केल्याचे आढळुन आले आहे.

तरी याबाबत खुलासा अप्राप्त आहे.

**आक्षेप क्र २.३:- पाणी पुरवठा विभागातील देयकांमध्ये आढळलेल्या तफावती / त्रुटींबाबत.**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पुर्व) शांती नगर सेक्टर ११ ते सेक्टर ७ व ०२ जलकुंभाकरीता ३५०mm व्यासाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे

मिरा-भाईंदर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाच्या खालील कामांचे देयक तपासले असता त्यामध्ये खालील तफावती / त्रुटी आढळून आल्या आहेत.

१) **कामाचे नाव :-** मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मिरारोड (पुर्व) शांती नगर सेक्टर ११ ते सेक्टर ७ व ०२ जलकुंभाकरीता ३५०mm व्यासाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे.

२) **लेखाशिर्ष :-** नवीन जलवाहिनी टाकणे.

३) **अंदाजित खर्च :-** रु.९९,०६,४००/-

४) **प्रशासकिय आर्थिक मंजूरी :-** मा. आयुक्त यांची दि.२१/०५/२०१४ रोजीची मंजूरी.

५) **तांत्रिक मंजूरी :-** मा. शहर अभियंता, मि.भा.मनपा यांची क्र.४७ दि.०७/०७/२०१४ रोजीची मंजूरी.

६) **कंत्राटदाराचे नाव :-** मे. विंध्या ट्रेडर्स

७) **मंजूर दर :-** अंदाजपत्रकापेक्षा ५% जास्त दराने

८) **मंजूर दरानूसार अपेक्षित खर्च :-** रु.१,०४,०१,७२०/-

९) **कार्यादेश :-** मनपा/पा.पु./कार्या/४४/२०१४-१५ दि.२१/०८/२०१४

१०) **कामाची मुदत :-** ०६ महिने दि.२१/०८/२०१४ ते २०/०२/२०१५ पर्यत.

**११) काम पुर्ण झाल्याची तारीख :-** दि.२८/०९/२०१४

**१२) बांधकाम नोंद वही :-** ९२४ / ०५ ते ०६

वरील कामांचे प्रथम रनींग देयक रु.३८,७१,५६६/- चे तपासताना खालील त्रुटी आढळून आल्या.

१) लेखा परीक्षणास कामाचा सर्व्हे रिपोर्ट सादर करण्यात आला नाही. चौकशी अंती वरील कामाचे अंदाजपत्रक जागेचे मोजमाप घेऊनच करण्यात आले आहे. तथापी, त्याचा रेकॉर्ड लेखा परीक्षणास सादर करण्यात आला नाही. त्यामुळे पुर्वीची जलवाहिनी किती खराब झाली होती व किती मोजमापाचे जलवाहिनी पुर्नवापरात येऊ शकली असती याचा बोध होत नाही.

२) एकुण १२४६.४८ मीटर लांबीचे पाईप पुरवठादाराने पुरविले आहेत. त्याची नोंद मोजमाप पुस्तक क्र.९२४ / ०५ ते ०६ वर खालील प्रमाणे करण्यात आलेली आहे

| चलन क्रमांक / दिनांक | पाईपची संख्या | | लांबी (मी.) | | एकुण लांबी (मी.) |
|---|---|---|---|---|---|
| ९६ दि.२७/०९/२०१४ | २५ | X | ६.०८ | = | १५२.०० |
| ९५ दि.२७/०९/२०१४ | २५ | X | ६.०८ | = | १५२.०० |
| दि. / /२०१४ | ३७ | X | ६.०८ | = | २४३.२३ |
| ९४ दि.२७/०९/२०१४ | १२<br>१३<br>०२<br>२३ | X<br>X<br>X<br>X | ६.०९<br>६.०८<br>६.०९<br>६.०८ | =<br>=<br>=<br>= | ७३.०८<br>७९.०४<br>१२.१८<br>१३९.८४ |
| ९३ दि.२७/०९/२०१४ | ०५<br>३५<br>०१<br>१७<br>०६<br>०१ | X<br>X<br>X<br>X<br>X<br>X<br>X | ६.०९<br>६.०८<br>५.७९<br>६.०९<br>६.०८<br>६.०६ | =<br>=<br>=<br>=<br>=<br>=<br>= | ३०.४५<br>२१२.८०<br>०५.७९<br>१०३.५३<br>३६.४८<br>०६.९६ |
| | | | | **एकुण** | **१२४६.४८** |

वरील पाईप दि.२७/०९/२०१४ रोजी पुरविले आहेत व मोजमाप दि.२८/१०/२०१४ रोजी करण्यात आले आहे. एवढ्या विलंबाने सदर मोजमाप का करण्यात आले व नेमके चलानप्रमाणे कसे करता आले ? याचा खुलासा लेखा परीक्षणास करण्यात यावा.

३) पुरवठादाराने पाईप पुरवठा हा ट्रकद्वारा केला असून चलन क्र.९३ ते ९५ वर ट्रक नंबर, ज्या कंपनीतून पाईप घेतले त्याची टॅलीशीट व इन्पेक्शन अहवाल जोडले आहेत व त्या प्रमाणे त्याची खात्री पटते. परंतू चलन नंबर ९६ वर ट्रक क्रमांक नसून त्या चलनाबरोबर जी कागदपत्रे जोडली आहेत (कंपनीची टॅलीशीट म्हणजेच कंपनीतून पुरवठा करण्यासाठी घेतलेले पाईप व इन्स्पेक्शन रिपोर्ट) हे चलन क्रमांक ९५ सोबत जोडल्यानूसारच आहेत. यामुळे चलन क्रमांक ९६ प्रमाणे पाईप उपलब्ध झाले नाहीत असा संशय निर्माण होतो व त्यामुळे १५२ मीटर पाईपचे देयक जास्तीचे अदा केल्याचे दिसुन येत आहे. त्याची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| चलन क्रमांक / दिनांक | टॅलीशीट क्रमांक / दिनांक | पाईपची लांबी X संख्या | एकुण लांबी (मी.) |
|---|---|---|---|
| ९६ दि.२७/०९/२०१४ | BSL/TS/2014/IS 007606 REV.01 Dt.23/09/2014 | ६.८ मी X २५ | १५२.०० |
| ९५ दि.२७/०९/२०१४ | BSL/TS/2014/IS 007606 REV.01 Dt.23/09/2014 | ६.८ मी X २५ | १५२.०० |

त्यामुळे १५२ मी. पाईप पुरवठादाराने पुरविल्याचे दिसत नसून त्याला अदा करण्यात आलेल्या एकुण देयक रक्कम रु.३९,७१,५६६/- पैकी १५२ मी. चे बील १५२ X ४३३५ = रु.६,५८,९२०+ ५% इतकी रक्कम आक्षेपाधीन आहे.

३) चौथे व अंतिम बील तपासताना खालील त्रुटी आढळुन आल्या.

अ) ITEM NO.1 एम.एस. पाईप पुरवठा अंदाजपत्रका प्रमाणे १२५०RMT करावयाचा आहे. प्रत्येक्षात १२४६.४८RMT पुरवठा केला व अंथरताना ITEM NO.11 नुसार १००९.३० मी. पाईपचा वापर केला.यामुळे २३७.१८ मी. पाईप उरले आहेत. मात्र सन २०१४-१५ च्या स्टॉक रजिस्टर मध्ये पृष्ठ क्र.२५ वर केवळ २०६ मी पाईप प्राप्त झाल्याची नोंद घेण्यात आलेली आहे. यामुळे ३१.१८ मी पाईप गोदामात प्राप्त न झाल्याचे दिसुन येते. तसेच ठेकेदारास रु. २३५२६५.३०/- इतकी रक्कम जास्त दिल्याचे वाटते. तसेच प्रत्यक्षकामा करीता १००९.३० मी. इतक्या पाईपची आवश्यकता असताना १२४६.४८ मी. पाईप का मागविण्यात आले अथवा स्विकारण्यात आले याचा खुलासा अपेक्षित आहे. यामुळे महानगरपालिकेचे १०२८१७५.३०+ ५% इतकी जास्तीची रक्कम गुंतुन राहिल्याचे आढळुन येते.

याबाबत खुलासा सादर करण्यात **आलेला नाही**.

**आक्षेप क्र २.४:- पाणी पुरवठा विभागातील देयकांमध्ये आढळलेल्या तफावती/ त्रुटींबाबत**

मिरा-भाईंदर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाच्या खालील कामांचे देयक तपासले असता त्यामध्ये खालील तफावती / त्रुटी आढळून आल्या आहेत.

१) **कामाचे नाव :-** मिरा रोड (पुर्व) शांती नगर येथे सेक्टर ५ इमारत क्र. ए-०३ ते ए-०४ व सेक्टर ५ बी-२७ ते सी-३८ व सेक्टर ६ इमारत क्र. बी-२१ ते सी-०४ पर्यत बिडाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे.

२) **लेखाशिर्ष व एकुण तरतूद :-** नवीन जलवाहिनी टाकणे. रु.

३) **अंदाजित खर्च :-** रु.२२,४६,६०९/-

४) **प्रशासकिय आर्थिक मंजूरी :-** मा. आयुक्त यांची दि.१७/०८/२०१४ रोजीची मंजूरी.

५) **तांत्रिक मंजूरी :-** मा. कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग मि.भा.मनपा यांची क्र.४३ दि.१७/०८/२०१४ रोजीची मंजूरी.

६) **कंत्राटदाराचे नाव :-** मे. अशुमिकी इन्फ्रा प्रा.लि.

७) **मंजूर दर :-** अंदाजपत्रकापेक्षा ५% जास्त दराने

८) **मंजूर दरानूसार अपेक्षित खर्च :-** रु.२३,५७,९३९/-

९) **कार्यादेश :-** मनपा/पा.पु./कार्या/७०/२०१४-१५ दि.१८/१२/२०१४

**१०**) **कामाची मुदत :-** ०६ महिने दि.१८/१२/२०१४ ते १७/०६/२०१५ पर्यत.

**११**) **काम पुर्ण झाल्याची तारीख :-** दि.२१/०२/२०१५

**१२**) **बांधकाम नोंद वही :-** ८९३ / ७२ ते ७८

**१३**) **देयक ५% जास्त दराने :-** रु.२४,६२,८८४/-

वरील कामांची बांधकाम नोंदवही तपासली असता Item No.01 प्रमाणे Excavation for foundation / pipe trenches in soft rocks & old cement & lime masonry foundation etc. complete.

| ठिकाण | Length | | Width | | Depth | | CMT |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सेक्टर ५ इमारत क्र. ए-३ ते ए-४ | 310.00 | x | 0.75 | X | 0.20 | = | 46.50 $M^3$ |
| सेक्टर ५ बी-२७ ते सी-३८ | 280.00 | x | 0.75 | X | 0.20 | = | 42.00 $M^3$ |
| सेक्टर ६ इमारत क्र.बी-२१ ते सी-४ | 150.00 | x | 0.75 | X | 0.20 | = | 22.50 $M^3$ |
| | **740.00** RMT | | | | | | **111.00 $M^3$** |

Item No.20 प्रमाणे Providing & Supplying ISI mark C.I. pipes of following class & dia etc. Complete.

150 mm = 360 RMT

200 mm = 310 RMT

वरील प्रमाणे ६७० RMT जलवाहिनी अंथरावयाची असल्याने ७४० RMT Excavation ची काय गरज होती ? त्यामुळे ७० RMT Excavation जास्तीचे झाले आहे असे वाटते. त्यामुळे १०.५० घन मीटर X ४८७.३० = रु.५११६.६५ इतकी रक्कम आक्षेपाधीन आहे.

**आक्षेप क्र २.५:- पाणीपुरवठा व त्यावर झालेल्या खर्चातील तुट...**

सन २०१४-१५ मध्ये पाणीपुरवठा व मलनिःस्सारण विभागाच्या जमा व खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

(रु.लाखात)

| अ.क्र. | जमा | |
|---|---|---|
| | **तपशिल** | **रक्कम** |
| | **महसुली जमा** | |
| १. | पाणीपट्टी | ३४२९.५२ |
| २. | जलउपकर | १०.६६ |
| ३. | पाणीपुरवठा सुविधा लाभ कर | ३५.२७ |
| ४. | नवीन नळ जोडणी शुल्क | ३६.९५ |
| ५. | अनधिकृत नळजोडणी नियमित करणेचे दंडशुल्क | ०.२० |
| ६. | अनधिकृत नळजोडणी पाणी वापर देय | - |
| ७. | बोरिंग शुल्क | ०.७९ |
| ८. | खड्डा दुरुस्ती/रस्ता क्रॉसींग शुल्क | २.७८ |
| ९. | नळजोडणी स्थानांतरण/दुरुस्ती शुल्क | ८.०७ |
| १०. | नळ पुर्नजोडणी | ०.३२ |
| ११. | नळ जोडणी नावात बदल | ०.५८ |
| १२. | पर्यवेक्षण शुल्क/छाननी शुल्क | १.१७ |
| १३. | न वटलेले धनादेश, विलंब व इतर | ४०.०० |

| | | |
|---|---|---|
| १४. | नळ जोडणी निविदा प्रपत्र शुल्क, | ०.४२ |
| १५. | टँकरद्वारे पाणी पुरवठा | ३५६.९९ |
| १६. | इतर | - |
| | **मलनिःसारण** | |
| १. | सेप्टीक टँक शुल्क | ४.०१ |
| २. | विशेष स्वच्छता कर / मलप्रवाह सुविधा लाभ कर | ९२९.७७ |
| | **एकूण** | **४८५७.५०** |

| **अ.क्र** | **खर्च** | |
|---|---|---|
| | **तपशिल** | **रक्कम** |
| | **महसुली खर्च** | |
| १. | पाणी देयक | ३५९८.७७ |
| २. | स्थायी आस्थापना | २५९.१३ |
| ३. | अस्थायी आस्था./सुरक्षा रक्षक | ११४.७८ |
| ४. | प्रवास भत्ता | ०.२२ |
| ५. | प्रशिक्षण शुल्क | - |
| ६. | टिसीएल पावडर व क्लोरील गॅस | ७.५४ |
| ७. | वितरण व्यवस्था/किरकोळ खरेदी/दुरुस्ती | ३००.५१ |
| ८. | मालमत्ता निगा दुरुस्ती | ३१.५५ |
| ९. | पंपिग स्टेशन किरकोळ खरेदी/दुरुस्ती | ३७.०४ |
| १०. | पंपिग व संपग्रह वीज देयक | ४३५.३३ |
| ११. | टँकर भाडे | २६५.२३ |
| १२. | सुचना प्रसिध्दी करणे | २.९२ |
| १३. | प्रदुषण मंडळ नियंत्रण शुल्क | १३.७१ |
| १४. | शहरातील जलवाहिन्यांचे सर्वेक्षण | - |
| १५. | फ्लो मिटर/व्हॉल्व बसविणे/दुरूस्ती करणे | १८.७७ |

| | | |
|---|---|---|
| १६. | आकस्मिक खर्च / वाहन इंधन | - |
| १७. | छपाई खर्च | ०.७९ |
| | **मलनिःसारण महसुली खर्च** | |
| १. | देखभाल दुरुस्ती | १२०.५८ |
| २. | वीज देयक | १७३.९८ |
| | **एकुण** | **५३८०.२७** |
| | **भांडवली खर्च** | |
| १. | साहित्य खरेदी | १२४.४८ |
| २. | नवीन जलवाहिनी टाकणे | १०२१.६४ |
| ३. | कुपनलिका/विंधन विहीर बांधणे | १२.११ |
| ४. | ५० द.ल.लि.पाणी योजना कर्ज परतफेड | ७४९.८० |
| ५. | पाण्याची टाकी /इमारती बांधकाम | १९.५५ |
| ६. | ५० द.ल.लि.पाणी योजना पूर्ण करणे | १३१.०६ |
| ७. | नवीन पाणी पुरवठा योजना | २४४९.३० |
| ८. | रेन वॉटर हार्वेस्टींग योजना | ७.९२ |
| | **एकुण** | **४५१५.८६** |
| | | |

पाणीपुरवठा विभागाकडील जमा व खर्चाचे अवलोकन केले असता त्यात महसुली तुट रु.५२२.७७ लाखाची तुट असल्याचे निदर्शनास येते. मिरा भाईंदर महानगरपालिके मार्फत पाणीपुरवठा “ना नफा ना तोटा” या तत्वानुसार लोकसेवेकरिता करण्यात येतो. या तत्वास अनुसरुन जमा व खर्चात येणारी रु.५२२.७७ लाखाची तुट भरुन काढणे क्रमप्राप्त आहे. सदर तुट भरुन काढण्याच्या अनुषंगाने विभागाने केलेल्या प्रयत्नांचा तपशील लेखापरिक्षणास उपलब्ध झाला नाही. सबब महानगरपालिकेस पाणीपुरवठयापोटी रु.५२२.७७ लाख इतका अतिरिक्त खर्च सहन करावा लागला अशी लेखापरिक्षणाची धारणा आहे.

**याबाबत कोणतीही माहिती अथवा खुलासा सादर करण्यात आलेला नाही.**

**आक्षेप क्र २.६:- महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना वाढीव पाण्याचे बिल अदा करणे विषयी.**

मिरा भाईदर महानगरपालिकेस शासनाने महाराष्ट्र ओद्योगिक विकास महामंडळा कडुन प्रतीदिन ३० द.ल.लि. पाणी पुरवठा मंजुर केलेला आहे. तसेच २० द.ल.लि पाणी पुरवठा उदयोग मंत्र्याच्या दि. ११/०३/२०१२ रोजीच्या बैठकीत मंजुर केलेला आहे. त्यासाठी रु.१५ प्रति घनलिटर प्रमाणे रु. ६.७५ कोटी अनामत रक्कमेचा भरणा महानगरपालिकेने केलेला आहे.

महामंडळाने अतिरिक्त पाणी पुरवठया बाबत जुन २०१४ पासुन बिलात मीटर नुसार होणारे देयक व ॲडजेस्टमेंन्ट क्वांटिटि नुसार देयक आकारणी केलेली आहे. त्याची माहिती खालील प्रमाणे आहे.

| महिना | पाणी पुरवठा (द.ल.लि) | दर(प्रति घनलिटर) | रक्कम (रु) |
|---|---|---|---|
| डिसें २०१३ | ८११८५५ | १५/- | ८०९६७९६/- |
| जाने.२०१४ | ७९३३२४ | १५/- | ११८९९८६०/- |
| फेब्रु.२०१४ | ७१२५२५ | १५/- | १०६८७८७५/- |
| मार्च.२०१४ | ७९३२७१ | १५/- | ११८९९०६५/- |
| एप्रिल.२०१४ | ८६३००७ | १५/- | १२९४५१०५/- |
| मे.२०१४ | ६८३२८२ | १५/- | १०२४९२३०/- |
| जुन२०१४ | ६८७१८२<br>ॲडजेस्टमेंन्ट क्वांटिटि १८३८ | १५/- | १०३३५३००/- |
| जुलै.२०१४ | ८०७४१७ | १५/- | १२११११२५५/- |
| ऑगस्ट२०१४ | ८७४९७४<br>ॲडजेस्टमेंन्ट क्वांटिटि ८९६५० | १५/- | १४४६९३६०/- |
| सप्टेंबर२०१४ | ८५५८१०<br>ॲडजेस्टमेंन्ट क्वांटिटि ५१४८०४ | १५/- | १९३५९२१०/- |
| ऑक्टोबर२०१४ | ८६२१४१<br>ॲडजेस्टमेंन्ट क्वांटिटि ६४५८६४ | १५/- | २२६२००७५/- |
| नोव्हेंबर२०१४ | ६९४८५६<br>ॲडजेस्टमेंन्ट क्वांटिटि ५३५११८ | १५/- | ११३२५७६०/- |
| डिसेंबर२०१४ | ७८३९६६<br>ॲडजेस्टमेंन्ट क्वांटिटि ६७८७६३ | १५/- | १६५५७३१/- |
| जाने.२०१५ | ६९५१२७<br>ॲडजेस्टमेंन्ट क्वांटिटि ६४४७१४ | १५/- | १२०५८५६८/- |
| फेब्रु.२०१५ | ५४५८५५<br>ॲडजेस्टमेंन्ट क्वांटिटि ५५०१०३ | १५/- | १०९५९५८/- |
| मार्च.२०१५ | ५६९५५९<br>ॲडजेस्टमेंन्ट क्वांटिटि ७०५६८५ | १५/- | १२४७७१९६/- |

महामंडळा कडुन पुर्वी मंजुर झालेल्या ३० द.ल.लि पाणी पुरवठया पैकी केवळ २० ते २२ द.ल.लि पाणी पुरवठा मीटर रिटिंग नुसार दररोज करण्यात येत आहे. महामंडळ मंजुर ३० द.ल.लि पाणी पुरवठा करत नसल्याचे आढळुन आले आहे. मात्र, वाढीव पाण्याचे बिल ॲडजेस्टमेंन्ट क्वांटिटि दर्शवुन २० द.ल.लि पेक्षा जास्त पाणी पुरवठा केल्याचे निदर्शनास येत आहे. वाढीव पाणी पुरवठा करीता स्वतंत्र जलवाहिनी असल्यास त्यावर मीटर बसवुन रिडिंग नुसार पाण्याचे देयक अदा करणे आवश्यक होते. तथापी महामंडळाने अंदाजित देयके सादर केलेली आहेत व महानगरपालिकेने ती अदा केलेली आहेत. सदर बाब गंभीर असुन महानगरपालिकेस पाणी देयका पोटी फारमोठे नुकसान झाल्याचे दिसुन येते.

वरील देयकामधील ॲडजेस्टमेंन्ट क्वांटिटि कशाच्या आधारे दर्शविली आहे याचा खुलासा करण्यात आलेला नाही.

**आक्षेप क्र २.७:- पाणी पुरवठा विभागाकरिता सी.आय. टायटन पाईप्स स्टॅण्डर्ड प्रमाणे सर्व १००.०० मी.मी. ते ६००.०० मी.मी व्यासाचे पुरवठा करणे.**

उपरोक्त विषयांकित कामाचे कार्यादेश मनपा/पापु/कार्या/१२७०/२०१४-१५ दि.१२/०९/२०१४ अन्वये देण्यात आलेले आहेत. या कामाचे तिसरे व अंतिम देयक तपासताना खालील त्रुटी आढळुन आलेल्या आहेत.

| कामाचे नाव | देयक क्र. | बाब क्रमांक | अंदाजित मागणी | देयकानुसार पुरवठा | मोजणी पुस्तिके नुसार पुरवठा/मोजणी पुस्तिका क्रमांक.व दिनांक | चलनानुसार पुरवठा / चलन क्रमांक | साठा रजिस्टरनुसार पुरवठा / साठा रजिस्टर व पृष्ठ क्रमांक | अतिरिक्त पुरवठ्याच्या मालाची रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सी.आय.टायटन पाईप्स स्टॅण्डर्ड प्रमाणे सर्व १५०.०० मी.मी. व्यासाचे पुरवठा करणे | प्रथम रनिंग | ०१ | ५०५ मी **X** ४=२२ मी<br>४.००मी **X** २=०८ मी<br>५.५ मी ४४=२४२मी | ५०५ मी **X** ४=२२ मी<br>४.००मी **X** २=०८ मी<br>५.५ मी ४४=२४२ मी | चलन क्र.६५३ ५.५ मी **X** ४ =२२ मी<br>चलन क्र.६५३ ५.५ **X** ४ = २२ मी<br>४.०० मी **X** २ =०८ मी<br>५.५ मी **X** ४४ = २४२ मी | चलन क्र.६५३ ५.५ मी **X** ४ =२२ मी<br>४.००मी **X** २=०८ मि<br>५.५ मी **X** ४४= २४२ मि | ५०५ मी **X** ४=२२ मी<br>४.००मी **X** २=०८ मी<br>५.५ मी ४४=२४२ मी | ५०,९३०.०० |

उपरोक्त मालाचा पुरवठा चलन क्र.६५३ अन्वये झाल्याची नोंद चलनात व साठा रजिस्टर मध्ये आढळुन येत आहे. मात्र, मोजणी पुस्तिकेनुसार चलन क्र.६५३ मधील ५.५ मी **X** ४ =२२ मी

ची नोंद दुबार झाल्याचे आढळते. पर्यायाने, पुरवठादारास २२.०० मी. पाईप पुरवठा केलेबाबत रु.५०,९३०/- इतके अतिरिक्त देयक अदा करण्यात आल्याचे निदर्शनास येते.

तरी, वरील अतिरिक्त देयक अदा केलेबाबतची रक्कम रु.५०,९३०/- वसुलीप्रात्र ठेवण्यात येत आहे.

## आक्षेप क्र २.८:- पाणी पुरवठा विभागाच्या वितरण व्यवस्था व देखभाल/ दुरुस्तीसाठी मेकॅनिकल जॉईंट व फिटींग पुरवठा करणे.

उपरोक्त विषयांकित कामाचे कार्यादेश मनपा /पापु/कार्या/२३/२०१४-१५ दि.०५/०८/२०१४ अन्वये देण्यात आलेले आहेत. या कामाचे तिसरे व अंतिम देयक तपासताना खालील त्रुटी आढळुन आलेल्या आहेत.

| **कामाचे नाव** | **देयक क्र.** | **बाब क्रमांक** | **अंदाजित मागणी** | **देयकानुसार पुरवठा** | **मोजणी पुस्तिके नुसार पुरवठा/मोजणी पुस्तिका क्रमांक.व दिनांक** | **चलनानुसार पुरवठा / चलन क्रमांक** | **साठा रजिस्टरनुसार पुरवठा / साठा रजिस्टर व पृष्ठ क्रमांक** | **अतिरिक्त पुरवठ्याच्या मालाची रक्कम (रु.)** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सी.आय.डी.एफ. स्लुस व्हॉल्व पुरवठा करणे १०० मी.मी | प्रथम रनिंग | ०१ | २१.०० | ३१.०० | चलन क्र.८१-२१.०० चलन क्र.८३-१०-०० एकुण ३१.०० ८९२/७७ ते ८६ | चलन क्र . ८१-२१-०० | २१.०० ३/३५ | ६९४८२.४० |

उपरोक्त मालाचा पुरवठा चलन क्र.८३ अन्वये झाल्याची नोंद चलनात व साठा रजिस्टर मध्ये आढळुन येत नाही . मोजणी पुस्तिकेनुसार १० सी.आय.डी.एफ.स्लुस व्हॉल्व (१०० मी.मी) पुरवठा केलेबाबत अतिरिक्त देयक अदा करण्यात आल्याचे आढळुन येते . सदर कामी रु.६९४८२.४० इतकी अतिरिक्त रक्कम माल आणला नसताना देखिल मे.विंध्या ट्रेडर्स यांना अदा केल्याचे स्पष्ट होते.

तरी, वरील अतिरिक्त देयक अदा केलेबाबतची रक्कम रु . ६९४८२.४० वसुलीप्रात्र ठेवण्यात येत आहे.

**आक्षेप क्र २.९:- पाणी पुरवठा विभागाच्या वितरण व्यवस्था व देखभाल/ दुरुस्तीसाठी मेकॅनिकल जॉईंट कॉलर्स पुरवठा करणे.**

| कामाचे नाव | देयक क्र. | बाब क्रमांक | अंदाजित मागणी | देयकानुसार पुरवठा | मोजणी पुस्तिके नुसार पुरवठा/मोजणी पुस्तिका क्रमांक.व दिनांक | चलनानुसार पुरवठा / चलन क्रमांक | साठा रजिस्टरनुसार पुरवठा / साठा रजिस्टर व पृष्ठ क्रमांक | अतिरिक्त पुरवठ्याच्या मालाची रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सी.आय. मेकॅनिकलजॉईंट कॉलर्स पुरवठा करणे(१५० म.मी जिफी जॉईंट्स | प्रथम रनिंग | ०६ | १५०.०० | १६०.०० | चलन क्र.८०-१५०.०० चलन क्र.८३-१०-०० एकुण १६०.०० ८९२/७७ ते ८६ | चलन क्र. ८०-१५०-०० | १५०.०० २/३५ | १५४२२.४० |

उपरोक्त मालाचा पुरवठा चलन क्र.८३ अन्वये झाल्याची नोंद चलनात व साठा रजिस्टर मध्ये आढळुन येत नाही. मोजणी पुस्तिकेनुसार १० सी.आय.मेकॅनिकल जॉईंट पुरवठा केल्याबाबतचे अतिरिक्त देयक अदा करण्यात आल्याचे आढळुन येते . सदर कामी माल आला नसताना देखिल रु .१५४२२.४० इतकी अतिरिक्त रक्कम मे.विंध्या ट्रेडर्स यांना अदा केल्याचे स्पष्ट होते.

तरी, वरील अतिरिक्त देयक अदा केलेबाबतची रक्कम रु .१५४२२.४० वसुलीप्रात्र ठेवण्यात येत आहे.

**आक्षेप क्र २.१०:- पाणी पुरवठा विभागाच्या वितरण व्यवस्था व देखभाल/ दुरुस्तीसाठी मेकॅनिकल डबल सॉकेट ९० डिग्री पुरवठा करणे.**

| कामाचे नाव | देयक क्र. | बाब क्रमांक | अंदाजित मागणी | देयकानुसार पुरवठा | मोजणी पुस्तिके नुसार पुरवठा/मोजणी पुस्तिका क्रमांक.व दिनांक | चलनानुसार पुरवठा / चलन क्रमांक | साठा रजिस्टरनुसार पुरवठा / साठा रजिस्टर व पृष्ठ क्रमांक | अतिरिक्त पुरवठ्याच्या मालाची रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मेकॅनिकल डबल सॉकेट ९० डिग्री पुरवठा करणे | व्दितीय रनिंग | १० | ५.०० | ६.०० | चलन क्र. ९१-६.०० | चलन क्र. ९१-५.०० | ६.०० ४/१४ | ४८४६.०० |

उपरोक्त मालाचा एकुण ५.०० इतका पुरवठा चलन क्र .९१ अन्वये झाल्याची नोंद आढळुन येते. मात्र, साठा रजिस्टर मध्ये एकुण ६.०० इतका पुरवठा झाल्याचे व मोजणी पुस्तिकेत देखील ६.०० इतकी मालाची नोंद आढळुन येत आहे . यामुळे चलनानुसार १.०० इतक्या मालाचे पुरवठा केल्याबाबतचे

अतिरिक्त देयक अदा करण्यात आल्याचे आढळुन येते. सदर कामी रु.४८४६.०० इतकी अतिरिक्त रक्कम मे. विंध्या ट्रेडर्स यांना अदा केल्याचे स्पष्ट होते.

तरी, वरील अतिरिक्त देयक अदा केलेबाबतची रक्कम रु . ४८४६.०० वसुलीप्रात्र ठेवण्यात येत आहे.

## आक्षेप क्र २.११:- पाणी पुरवठा विभागाच्या वितरण व्यवस्था व देखभाल/ दुरुस्तीसाठी मेकॅनिकल जॉईंट व फिटींग पुरवठा करणे

| कामाचे नाव | देयक क्र. | बाब क्रमांक | अंदाजित मागणी | देयकानुसार पुरवठा | मोजणी पुस्तिके नुसार पुरवठा/मोजणी पुस्तिका क्रमांक.व दिनांक | चलनानुसार पुरवठा / चलन क्रमांक | साठा रजिस्टरनुसार पुरवठा / साठा रजिस्टर व पृष्ठ क्रमांक | अतिरिक्त पुरवठ्याच्या मालाची रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| रबर पॅकिंग (५ मी.मी) पुरवठा करणे | तिसरे व अंतिम | २० | २८०.०० किलो | १०२५.०० किलो | चलन क्र.९०- १२५ किलो<br>चलन क्र.९२- ९०० किलो<br>एकुण १०२५.०० किलो<br>७८५/८३/९१ | चलन क्र. - ९००.००<br>चलन क्र. - १२५.००<br>चलन क्र. - १०२५.०० | १०२५.००<br>४/७१ | १,८६,२५०.०० |

उपरोक्त मालाचा एकुण १०२५.०० किलो इतका पुरवठा चलन क्र.९० व ९२ अन्वये झाल्याची नोंद आढळुन येते. मात्र, सदर मालाची अंदाजित मागणी २८०.०० किलो इतकी असताना मे, विंध्या ट्रेडर्स या पुरवठादाराने १०२५.०० किलो इतका माल पुरवल्याचे दिसुन येते . वर्षअखेर ८००.०० किलो इतका माल शिल्लक राहिल्याचे साठा रजिस्तरनुसार आढळुन येते . अशाप्रकारे, प्रत्यक्ष आवश्यक्तेपेक्षा सुमारे ५ पट जास्त माल पुरवठादाराने पुरविल्याचे स्पष्ट होते . यामुळे सदर माल अनावश्यक शिल्लक राहिल्याचे निदर्शनास येते.सबब, त्यावरील खर्च आक्षेपार्ह आहे.

तरी वरील आक्षेपार्ह खर्चाबाबत खुलासा अप्राप्त आहे.

## आक्षेप क्र २.१२:- बंद संयोजने थकीत बाकी बाबत...

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील ज्या मीटर धारकांनी पाणी पुरवठयाची देयके भरलेली नाहीत. अगर इतर कारणामुळे त्याची नळ संयोजने बंद करण्यांत आलेली आहेत. अशा मीटर धारकांकडे असलेली बिलांची थकीत बाकी त्वरित वसुल होणे आवश्यक आहे.

बंद संयोजनापोटी धारकांकडे किती बाकी शिल्लक आहे याची **रक्कम** मागणी रजिस्टर मध्ये दर्शविण्यात आलेली दिसुन येत नाही. तपशिल लेखापरिक्षणास सादर करण्यात आलेला नाही. बंद संयोजनापोटी थकित असलेली बाकी वर्षानुवर्षे थकित असुनही बाकी वसुल करण्याबाबत पाणी पुरवठा विभागाकडुन कार्यवाही झाली नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे महानगरपालिकेचा निधी मोठया प्रमाणात अडकुन राहिलेला आहे. सदर रक्कम वसुल करण्याबाबत विभागाने कोणतीही ठोस उपाययोजना केलेली नाही व याकामी विभाग प्रमुख यांचेकडून संपुर्णपणे दुर्लक्ष झालेले असल्याचे आढळून येते. याबाबत खात्री करुन सदरच्या रक्कम वसुल करणेबाबत आवश्यक आहे. **खालील यादीप्रमाणे ग्राहकांची बिले बजावण्यात आलेली नाहीत**.

## बिल न काढलेल्या ग्राहकांची यादी

**डोंगरी विभाग**

| अ.क्र | ग्राहकांचे नाव | ग्राहक क्रमांक | रजिस्टर क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | मायकल मॅटी नुनीस | DD00666582 | D 6/78 |
| २ | सिरिल बोर्जीस | DD 00600583 | D6/79 |
| ३ | सॅमसन सिरिल रॉड्रीक्स | DD00600584 | D6/80 |
| ४ | रेना सिरिस बोर्जीस | DD00600585 | D6/81 |
| ५ | कल्पना चावडा | DD00600588 | D6/84 |
| ६ | फलोरिया आल्मेडा | DD00600589 | D6/85 |
| ७ | जेरोल परेरा | DD00600590 | D6/86 |
| ८ | नासीर खान | DD00600592 | D6/88 |
| ९ | नासीर खान | DD00600593 | D6/88 |
| १० | नासीर खान | DD00600594 | D6/90 |
| ११ | नासीर खान | DD00600595 | D6/91 |
| १२ | नासीर खान | DD00600596 | D6/92 |
| १३ | नासीर खान | DD00600597 | D6/93 |
| १४ | स्टीफन गोम्स | D D00600598 | D6/94 |
| १५ | जॉगी कैतान मुनीस | D D00200043 | D2/35 |
| १६ | बद्रिस गुलाम पाटील | D D00300154 | D3/54 |
| १७ | निकलाव निग्रेल | XUT05800464 | X5/62 |

## नवघर विभाग

| अ.क्र | ग्राहकांचे नाव | ग्राहक क्रमांक | रजिस्टर क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | नवलादेवी निवास | JG02702641 | J27/89 |
| २ | नटवर हाऊस कॉ.हौ.सो | JNA4503422 | J45/4 |
| ३ | नटवर हाऊस कॉ.हौ.सो | JNA4503423 | J45/5 कनेक्शन बंद करण्यात का आली |
| ४ | नटवर हाऊस कॉ.हौ.सो | JNA4503625 | J45/57 |
| ५ | ओ. पी इंडस्ट्रीज | JNA1903896 | - |
| ६ | मे. इंडीया स्टील | JNA1903899 | J89/43 |

## मिरा विभाग

| अ.क्र | ग्राहकांचे नाव | ग्राहक क्रमांक | रजिस्टर क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | हरिचंद्र पाटील | RML0200243 | R2/29 |
| २ | दामोदर मेस्त्री | RML0200244 | R2/29 |
| ३ | सदानंद पाटील | RML0200 | R2/66 |
| ४ | प्रदिप | QML020108 | Q2/20 |

## भाईदर विभाग

| अ.क्र | ग्राहकांचे नाव | ग्राहक क्रमांक | रजिस्टर क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | प्रभुलाल सिंगोलीया | HSU3002555 | H30/11 |
| २ | संजय इंटरप्रायसेस | HKM3002624 | H30/64 |
| ३ | मेघा वेलफेयर | HMK0904324 | H9/45 |
| ४ | मधुबेन गाला | HMK0303939 | H3/33 |
| ५ | गोतेस्ट होम्स | MKN030085 | M3/85 |
| ६ | सोनम अन्नपुर्णा | MKN 1000557 | M10/56 |
| ७ | बालाजी अर्शन | MKN 5100797 | M51/71 |
| ८ | सोनल सागर | MKN 1802172 | M81/19 |
| ९ | राम वाटीका बी | MKN 1802246 | M 18/92 |
| १० | राम वाटीका बी | MKN 1802247 | M 18/93 |
| ११ | राम वाटीका बी | MKN 1802248 | M 18/94 |
| १२ | तिरुपती वाटीका | MKN 2202611 | M22/61 |

खालील थकबाकी वसुल न झालेल्या नळ कनेक्शन धारकांची यादी.

| अ.क्र | इमारतीचे नाव | ग्राहक क्र. | थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|
| १ | मिरा धाम कॉलनी /डी | RML0200320(R2/80) | २९०५४/- |
| २ | मिरा धाम कॉम्प.ए | R2/81 | ६४१३६/- |
| ३ | जुवेल अपार्ट. | JGO0700046(J7/46) | २००१३/- |
| ४ | किताब एल.बसीर | JG02100836 | १७८१०/- |
| ५ | गांधी इंड. | JGO2100895 | ११९००/- |
| ६ | नम्रता केमिकल्स | IFA 0100058 | १०५२०२/- |
| ७ | स्वेता सैरजी | IFA 0100136 | २०३२०/- |
| ८ | अरुण फॉस्पो प्रा.लि | Pmh010824 | ५१९४०/- |

वरील ग्राहकांची बिले का बजावण्यात आली नाही . तसेच काही नळ कनेक्शन धारकांची थकबाकी वसुल का करण्यात आली नाही. याबाबतचा खुलासा अप्राप्त आहे.

**आक्षेप क्र २.१३ः- धनादेश नोंदवहीबाबत...**

सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाकरिता पाणी पुरवठा विभागाने ठेवलेल्या धनादेश नोंदवहीत घेतलेल्या नोंदी समक्ष अधिका-याने अधिप्रमाणीत केलेल्या नाहीत.

परत आलेल्या धनादेशाची रक्कम रोखीने घेतलेली आहे किंवा नाही याची नोंद धनादेश नोंदवही मध्ये घेणे आवश्यक आहे. तथापि परत आलेल्या धनादेशाबाबत अशी कार्यवाही झालेली नसल्याचे आढळून आले. सदरच्या धनादेशाची वसूली झालेली आहे याची शहानिशा विभाग प्रमुखांनी करावी. तसेच धनादेश नोंदवहीमध्ये प्रत्येक दिवसाच्या धनादेशाच्या नोंदी घेण्यात आलेल्या नाहीत या नोंदी दररोज का घेण्यात येत नाहीत.

याबाबत विभागास अनुपालन सादर करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे. अनुपालन अप्राप्त आहे.

**आक्षेप क्र २.१४ः- सन २०१४-१५ मागणी रजिस्टर मधील मीटर रिटिंग नोंदी बाबत...**

१) यमुना सुष्टी सेक्ट.३ ग्राहक क्र.०१८/३४ osi1801272 या ईमारतीचे मे २०१४ ते ऑगस्ट २०१४ पाणी बिल सरासरी ८००८ रु. असुन पुढील पाण्याचे सप्टे. ते डिसे.२०१४ चे बिल

मिटर रिटींग प्रमाणे ३२३४ असे बजविण्यात आले आहे. मे २०१४ ते ऑगस्ट २०१४ चे सरासरी बिल कोणत्या आधारे काढण्यात आले याचा बोध लेखापरिक्षणांस होत नाही.

२) अे. केअर हॉस्पीटल OSI 2301640(0-23/22) सदर कनेक्शन १ इंच बिगर घरगुती दराने पाणी आकारणी करण्यात येत असुन माहे जाने २०१४- एप्रिल २०१४ या चार महिन्यात अत्यंत कमी प्रमाणात रु. ३०८०/- काढण्यात आलेले दिसुन येते आहे.

३) शैलेश पुजारी OSI २३०२०२७ (०-२३/५४) या ग्राहकांचे बिगर घरगुती माहे जाने२०१४ ते एप्रिल२०१४ या मासिक पाण्याचे बील रु. २७१८८/- रु. असुन माहे मे२०१४ ते ऑगस्ट२०१४ या मासीक रु. ३८०८/- रु. एवढे कमी का काढण्यात आले व कसे .

४) अे. ई. लाकडावाला OSI 1801377 (018/94) माहे जाने ते एप्रिल २०१४ चे बिल ८००८ असुंन मे२०१४ ते ऑगस्ट२०१४ या मासिक देयकाची बिल काढण्यात आलेले नाही. व सप्टे ते डिसे.२०१४ या मासीक देयकांचे बिल रीडिग प्रमाणे रु. ३५९१/- असें काढण्यात आले आहे. तरी ही मे.२०१४ ते ऑगस्ट २०१४ या कालावधीचे बिल न काढल्याने ८००८/- रु. एवढे नुकसान झालेले आहे. याचा खुलासा करण्यात यावा.

५) वेलंकनी इंटरप्रायजेस ग्राहक क्र.डी डी ००६००५३४ (डी६/३०)याचे पाण्याचे बिल माहे मे २०१४ ते ऑगस्ट २०१४ चे बिल रिडींग प्रमाणे रु. २८०००/- काढण्यात आलेले असुन माहे सप्टे. २०१४ ते डिसे .२०१४ या देयकांचे बिल फक्त रिडींग प्रमाणे रु. १४०००/- आकारणी करण्यात आली आहे. तरी एवढी तफावत कशामुळे आली याचा खुलासा करण्यात यावा.

६) डिव्हाईन हिम स्कुल ग्राहक क्र. JGO2702542(J27/35) व JG02702543(J27/36) या **शाळेच्या १ इंच व्यासाची जल जोडणी असुन सरासरी बिल रु.२४७८/- कमी प्रमाणात आकारणी केलेली दिसून येते . तर गामा पब्लिक स्कुल JNA2903395(J29/36) व सनरेज स्कुल JNA2903386(J29/35) या शाळेच्या १ इंच व्यासाची जल जोडणी असुन सरासरी बिल रु.४९०/- कमी आकारणी का केली आहे याचा खुलासा करण्यात यावा.**

७) **भारती दर्शन JGO2502984 (J25/77) व भारती दर्शन JGO2502985 (J25/78) या इमारतीचे माहे.मे२०१४ ते ऑगस्ट२०१४ चे सरासरी बिल रु.६६००/- काढण्यात आलेले आहे. व माहे सप्टे.२०१४ ते डिसे.२०१४ चे देयक काढताना दि.२४/०९/२०१४ रोजी नुसार नवीन मी टर बसविलेला आहे तरी , १/०९/२०१४ ते २३/०९/२०१४ या कालावधीत सरासरी बी ल रु.२३०२ (.११५१+११५१) आकारणी करण्यात आलेली दिसुन येत नाही. याचा खुलासा करावा.**

८) नजीर अली ग्रा .क्र.MKN0700967(M7/59) यांचे माहे . जाने.२०१४ ते एप्रिल २०१४ या कालावधीत बिअल रु .८०९२/- रु. एवढे काढण्यात आलेले असुन माहे . मे.२०१४ ते ऑगस्ट २०१४ या कालावधीत पाण्याचे बिल रु .१००८/- एवढे कमी काढण्यात आलेले आहे . व पुढील पाणी बिल का काढण्यात आले नाही याचा खुलासा करण्यात यावा.

९) मिरा कॉ.हौ.सो.ग्राहक क्र.RML0100141(R1/49) इमारतीचे रोड दुरुस्ती करताना जल जोडणी तोडल्यामुळे बिलाची आकारणी करण्यात आलेली नाही . असा मागणी रजिस्टरला शेरा असुन सदर इमारत कोणत्या स्त्रोत्रा द्वारे पाणी वापर करते याचा खुलासा करावा.

१०) इमरान अहमद कामदार DSI 1201037(072/32) ´É या पुनम सरगम OSI 2302018 (0-23/62) OSI 2302017 (023/63) तारांगण OSI2301593(0-23/15)
या ग्राहकांचे बिल कोणत्या तारखेपासुन बंद करण्यात आले व कोणत्या कारणाने बंद करण्यात आले यांची रजिस्टर नोंद नाही.

वरिल सर्व बिले कमी आकारण्यात आलेली आहेत. ग्राहक पाण्याचा वापर व्यापार/ उद्योग धंद्यासाठी करीत आहे . व त्यामुळे त्याचे पाणी वापराचे मीटर रिडिंग थोड्याफार फरकाने यावयास पाहिजे होते . परंतु मीटर रिडिंग ५०% पेक्षा कमी असल्याने पाणी मीटर(जलमापक यंत्र) मध्ये काही बिघाड वगैरे झाला असल्याची शक्यता असुन त्यामुळेच पाणी वापर रिडिंग कमी येत असावे अस लेखा परिक्षणास वाटते. तरी अशा ग्राहकांचे मीटर वेळीच चेक करून पाणी वापर मिट र रिडिंग बरोबर आहे किंवा काय यांचा पडताळणी करावयास पाहीजे होती. परंतु तसे न केल्यामुळे अशा अनेक मिटर रिडिंग मध्ये पाणी वापर ५०% पेक्षा कमी येत आहे . त्यामुळे महानगरपालिकेचे प्रचंड प्रमाणात नुकसान होत असावे असे वाटते.

वरिल बाबत अनुपालन अप्राप्त आहे.

**आक्षेप क्र २.१५:- साठा रजिस्टसर (किरकोळ पावती पुस्तके) व गहाळ पावती बाबत.**

भांडार विभागाकडुन प्रत्येक विभागासाठी किरकोळ पावती पुस्तके छापुन देण्यात येतात . विभागाने प्राप्त पावती पुस्तकांची नोंद साठा रजिस्टर मध्ये घे ऊन साठा रजिस्टर अद्यावत ठेवणे आवश्यक आहे.

पाणी पुरवठा विभागाने किरकोळ पावती पुस्तकाचे साठा रजिस्टर लेखापरिक्षण पथकास उपलब्ध करुन दिलेले नाही.

तसेच पावती पुस्तके क्र.७०८८ पावती क्र.७०८८९ सदर क्रमांकाचा दोन्ही प्रती ( मुळ प्रत + छायाप्रत) किरकोळ पावती पुस्तकांमध्ये नसल्याचे आढळुन आलेले आहे . सदर पावतीची नोंद

पोटकिर्द मध्ये आढळुन आलेली नाही. त्यामुळे सदर पावतीचा गैरवापर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

वरिल पावती बद्दल खुलासा लेखापरिक्षणास सादर करण्यात आलेला नाही.

# लेखा विभाग

**आक्षेप क्र ३.१ :- अग्रीम समायोजन बाबत....**

महानगरपालिकेतील अधिकारी व कर्मचा-यांना निरनिराळ्या कामासाठी त्यांच्या विभागाच्या मागणी नुसार वेळोवेळी अग्रीम दिल्याचे दिसु न येते. लेखा शाखेने महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ मधील नियम १८९ नुसार क्र.१४७ मध्ये ठेवलेल्या अग्रीम नोंदवहीची लेखाप रीक्षण करताना खालील त्रुटी आढळुन आल्या.

१) अधिकारी व कर्मचा-यांना कामासाठी दिलेल्या अग्रीमाची नोंदवही तपासली असता १९९३-९४ पासुनच्या अग्रीम रक्कमांचे मार्च २०१५ अखेर पर्यंत रक्कम रु .५८२०२१६/- समायोजन झालेले नाही.

महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ मधील नियम १८९ नुसार दिलेल्या अग्रीमाची वसुली तात्काळ किंवा अग्रीम दिल्याच्या तारखेपासुन तीन महिन्याच्या आत करावयाची आहे तसेच पहिले अग्रीम दिल्यानंतर त्याचे वसुली झाल्याशिवाय दुसरे अग्रीम देय नाही असे असताना मनपा वैद्यकिय अधिकारी , उद्यान अधिक्षक, आरोग्य अधिकारी, सार्वजनिक निवड णुक अधिकारी , स्थानिक संस्था कर अधिकारी यांना वारंवार अग्रीम दिल्याचे दिसुन येते. अग्रीम घेतलेल्या अधिका-यांमधील प्रतिनियुक्तीचे अधिकारी मुळ सेवेत गेले आहे परंतु त्यांच्या नावावर दर्शविण्यात आलेले अग्रीम सन १९९३-१९९४ ते आजतागायत समायोजन केलेले नाही . तसेच से वानिवृत्त व मयत कर्मचा- यांच्या नावावर अग्रीम दिसुन येते. याबाबतीत अग्रीमाची वसुली कशी करण्यात येईल याबाबत लेखापरिक्षण विभागास खुलासा करण्यात यावा.

यापुर्वी झालेल्या लेखापरिक्षणाच्या आक्षेपाधीन रक्कमाचे समायोजन झाल्याबाबतचा अहवाल लेखा परिक्षण विभागास अजुन पर्यंत प्राप्त झालेला नाही.

२) लेखा विभागाने नमुना नं .१४७ मध्ये ठेवलेल्या अग्रीम नोंदवहितील सन २०१२-१३ ते सन २०१४-१५ पर्यंत प्रदान अग्रीम वसुल झालेला अग्रीम व शिल्लक अग्रीम यांचा तपशील तपासताना खालील प्रमाणे फरक आढळुन आला.

**<u>सन-२०१२-१३</u>**

| अ.क्र | अग्रीम | मागील अग्रीम | चालु अग्रीम | एकुण | |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रदान अग्रीम | ३९४७६०४.०० | ६७९६९९०.०० | १०७४४५९४.०० | |
| २ | वसुल झालेला अग्रीम | ५२६७६६.५० | ४५२८९६८.०० | ५०५५७३४.५० | फरक |
| | शिल्लक अग्रीम | ३४२०८३७.५० | २२६८०२२.०० | ५६८८८५९.५० | - |

**<u>सन २०१३-१४</u>**

| अ.क्र | अग्रीम | मागील अग्रीम | चालु अग्रीम | एकुण | फरक |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रदान अग्रीम | ६२३९१५९.५० | २२६८९९०.०० | ८५०८१४९.५० | |
| २ | वसुल झालेला अग्रीम | ७८८०७४.५० | १६४४५३०.०० | २४३२६०४.५० | |
| शिल्लक अग्रीम | | ५४५१०८५.०० | ६२४४६०.०० | ६०७५५४५.०० | +५५०३००/- |

**<u>सन २०१४-१५</u>**

| अ.क्र | अग्रीम | मागील अग्रीम | चालु अग्रीम | एकुण | फरक |
|---|---|---|---|---|---|
| १ | प्रदान अग्रीम | ५६०२७०.०० | २६६७४४३.०० | ८२७०१६३.०० | |
| २ | वसुल झालेला अग्रीम | ४०५५०४.०० | २०४४४४३.०० | २४४९९४७.०० | |
| शिल्लक अग्रीम | | ५१९७२१६.०० | ६२३०००.०० | ५८२०२१६.०० | -४७२८२५/- |

याबाबत वरिल फरकाच्या अनुषंगाने सन २०१२-१३ मधील वसुल झालेल्या अग्रीमांची दुबार नोंद सन २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये घेतल्याचे आढळुन आलेले आहे .तरी सदर चुकींची दुरुस्ती करुन लेखापरिक्षणास फेर सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते.

वरील नोंदी बाबत कोणताही खुलासा सादर करण्यात आलेला नाही.

**आक्षेप क्र ३.२:- येणी असलेल्या अनुदानांबाबत, ज्यादा खर्च व कमी खर्च..**

मिरा भाईंदर महानगरपालिकेचे २०१४-१५ या वित्तीय वर्षाच्या वार्षिक लेखे , अंदाजपत्रकाचे अवलोकन केले असता खालील प्रपत्रात नमुद केल्यानुसार महानगरपालिकेला अंदाजपत्रकीय तरतुदीतील अपेक्षित येणीपेक्षा कमी अनुदान प्राप्त झाले आहे.

**<u>वित्तीय वर्ष २०१४-१५ जमा बाजु</u>**

## जमा बाजु

**( रक्कम रु. लाखात )**

| **अ.क्र** | **जमा बाजु बाबतचा तपशील** | **सुधारीत तरतुद(रु)** | **२०१४-१५ मधील प्रत्यक्ष जमा(रु)** | **कमी जमा(तफावत रु)** |
|---|---|---|---|---|
| १ | मुलभुत सुविधा अनुदान | ११००.०० | - | ११००.०० |
| ३ | नगरोत्थान पर्जन्य जलवाहिन्या केंद्र राज्य शासनाकडिल अनुदान | ३५००.०० | - | ३५००.०० |
| ४ | विशेष स्वच्छता/ मलप्रवाह सुविधा | १४००.०० | ९२९.७७ | ४७०.२३ |
| ५ | **Bsup** योजना | | - | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | केंद्र राज्यशासन अनुदान | १८००.०० | | १८००.०० |
| ६ | म.जी. प्राधिकरणाकडुन येणे रक्कम | २१०.०० | - | २१०.०० |
| ७ | अग्रिम समायोजन | २००.०० | २४.२७ | १७५.७३ |
| **एकुण** | | **८२१०.००** | **९५४.०४** | **७२५५.९६** |

शासकीय अनुदानाच्या बाबतीत ( वरिल तक्त्यातील बाब नं १,२,३,४ मध्ये रक्कम अप्राप्त आहे. अनुदान प्राप्त करण्यासाठी प्रयत्न केले असल्याचे लेखपरीक्षणास आढळुन आलेले नाही. याबाबत खुलासा अप्राप्त आहे.

## वित्तीय वर्ष २०१४-१५ खर्च बाजु

**जादा खर्च बाजु** **(रक्कम रु लाखात)**

| अ.क्र | जादा खर्चा बाबत तपशील | सुधारीत तरतुत(रु) | २०१४-१५ मधील प्रत्यक्ष खर्च(रु) | जादा खर्च (तफावत रु) |
|---|---|---|---|---|
| १ | MMRDA कर्ज निवारण निधी | १५००.०० | १५७९.८३ | ७९.८३ |
| २ | निवृत्ती वेतन व उपदाने | ३७५.०० | ४४१.६७ | ६६.६७ |
| ३ | शासन कर भरणा<br>स्थानिक संस्था कर | ५०.०० | ६१.९५ | ११.९५ |
| ४ | हस्तातंरण/ समायोजन | ५५.०० | १५८.८२ | १०३.८२ |
| **एकुण** | | **१९८०.००** | **२२४२.२७** | **२६२.२७** |

उपरोक्त बाबीवर तरतुद रक्कमेपेक्षा २६२.२७ लाख एवढा जास्त खर्च केला आहे . सदरचा खर्च महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता १९७१ मधील नियम क्र २८ नुसार जादा खर्च झालेला असुन नियम क्र.३० अन्वये पुर्नविनियोजन करुन जादा खर्चा साठी तरतुद करणेची गरज आहे. पुर्नविनियोजन केले असल्यास त्याची नस्ती लेखापरिक्षणास तपा सण्यासाठी सादर करण्यात आलेली नाही.

**कमी खर्च** **(रक्कम रु लाखात)**

| अ.क्र | जमा बाजु बाबतचा तपशील | सुधारीत तरतुद(रु) | २०१४-१५ मधील प्रत्यक्ष जमा(रु) | कमी खर्च(तफावत रु) |
|---|---|---|---|---|
| १ | कर्मचारी गणवेश व पावसाळी साहित्य | २५.०० | ८.९२ | १६.०८ |
| २ | समकक्ष व अधिकारी वर्ग | २०.०० | ८.३७ | ११.६३ |
| ३ | मा.नगरसेवक मानधन | ८०.०० | ६६.१७ | १३.८३ |
| ४ | नगरसेवक प्रशिक्षण व प्रवास भत्ता | १०.०० | ०.१० | ९.९० |
| ५ | स्थायी/ आस्थापना (स्थानिक संस्था कर) | ३३२.१४ | २७३.४५ | ५८.६९ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | स्थायी/ आस्थापना कर विभाग | ४९२.९० | ४१३.२६ | ७९.६४ |
| ७ | शहर स्वच्छता आराखडा | ५०.०० | ० | ५०.०० |
| ८ | अस्थायी आस्थापना (रुग्णालय) | १५०.०० | ९९.१३ | ५०.८७ |
| ९ | रुग्णालयीन कपडे धुलाई / साफसफाई | ७०.०० | ५०.०३ | १९.९७ |
| १० | श्र्वानदंश/ सर्पदंश/ कावीळ लस खरिदी | ५०.०० | ४.८२ | ४५.१८ |
| ११ | सार्व.स्मशानभुमी व दफनभुमी दुरुस्ती | ६५.०० | १३.१९ | ५१.८१ |
| १२ | स्मशान भुमी सुरक्षा रक्षक | ७०.०० | ६१.०२ | ८.९८ |
| १३ | सार्व.सभागृह/ नगरभवन साहित्य | २०.०० | - | २०.०० |
| १४ | स्थायी आस्थापन ( बांधकाम) | ३७७.३९ | २९६.८५ | ८०.५४ |
| १५ | इंड्स्टीयल मधील रस्ते /गटारे सुधारणा | ३००.०० | १९४.४५ | १०५.५५ |
| १६ | संगणक देखभाल व दुरुस्ती करणे | ५०.०० | २३.९७ | २६.०३ |
| १७ | नगरसेवक निधी | १०००.०० | ६३२.६० | ३६७.४० |
| १८ | प्रभाग समिती निधी | १४५०.०० | ६७४.७७ | ७७५.२३ |
| १९ | आपातकालीन सुरक्षा व्यवस्था निधी | ८५.०० | - | ८५.०० |
| २० | मनपा कर्मचारी मेडिक्लेम योजना | १२०.०० | ८६.७६ | ३३.२४ |
| २१ | नवीन वाहन खरेदी | ३०.०० | १२.८४ | १७.१६ |
| २२ | संगणक प्रणाली/नेटवर्किंग/ संगणक साहीत्य खरेदी | ९५.०० | ३५.१४ | ५९.८६ |
| २३ | भाईंदर (प) हॉस्पीटल बांधकाम | ३००.०० | ३०.९८ | २६९.०२ |
| २४ | रुग्णालये फर्निचर उपकरणे/ लॅब चालु करणे | २००.०० | १४.९४ | १८५.०६ |
| २५ | नवीन रस्ते बांधणे | १३१५.०० | ८३२.४० | ४८२.६० |
| २६ | मलनीसारण केंद्र दुरुस्ती | ४५०.०० | १२०.५८ | ३२९.४२ |
| २७ | बी.एस.यु.पी योजना केंद्र/ राज्य शासन अनुदान | १८००.०० | ७६०.८९ | १०३९.११ |
| **एकुण** | | **९००७.४३** | **४७१५.२३** | **४२९१.८** |

सुधारीत तरतुद जास्त केल्यामुळे इतर बाबीवरिल खर्चावर काटकसर करावी लागली . त्यामुळे मोठ्या प्रमाणात तरतुद शिल्लक राहिली आहे. याबाबत खुलासा करण्यात आलेला नाही.

**आक्षेप क्र ३.३ :- बँक पासबुकामधील शिल्लक व सर्व साधारण रोख वहीतील शिल्लक याचा ताळमेळ घेणे...**

लेखा विभागातील सर्वसाधारण रोख नोंदवही संबंधी ताळमेळपत्रक तपासले असता मार्च २०१५ विवरण पत्रातील खालील प्रमाणे तफावती आढळुन आलेल्या आहेत.

| अ. क्र. | खाते क्र. | बँकेचे नाव | कॅश बुक प्रमाणे रक्कम (रु.) | पासबुक प्रमाणे रक्कम (रु.) | तफावत रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १ | १०२५४४१९०६३ | भारतीय स्टेट बँक | ४,२८,३९,१४८.९७/- | ८१६९८९०६.४४/- | ३८८५९७५७.४७ |
| २ | ४४६४५९८९७ | इंडियन बँक | १०९५७३६७.७०/- | १२८०१७३९.७५/- | १८४४३७२.०५ |
| ३ | ०८८२१०१०००४७१० | ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स | ६४१५४६१.०३/- | १३६६३०७८.१३/- | ७२४७६१७.०१ |
| ४ | ५०२००००४३५४२१२ | HDFC बँक- water | ६६६६९९३९/- | ७७८८७९००.३९/- | ११२१७९६१.३९ |
| ५ | ५०२००००४३५४२२५ | HDFC बँक- tax | १३२०९५८९०/- | १२४२८६५२१.७४/- | ७८०९३६८.२६ |
| ६ | ३९२८०१००५०५४५ | युनियन बँक ऑफ इंडियन | ७०८८३९८.७७/- | ५७१३३०.७७/- | ६५१७०६८ |
| ७ | ४४६४५९१९४ | इंडियन बँक | २६४२०४०/- | ४६७१९३६/- | २०२९८९६ |
| ८ | ०६६५१४५००००३४ | HDFC बँक | १८१९४६४९.६२/- | १४५३३९७६/- | ३६६०६७३.६२ |
| ९ | २४६८२०१००५९४१ | कॅनेरा बँक | ११५३६०६०९.५३/- | ५९८०५.००/- | ११५३००८०४.५३ |
| १० | ००२८०५००४१०८ | आयसीआयसीआय बँक | १५६९९२/- | उपलब्ध झाले नाही | - |
| ११ | १०२५४४१९०७४ | भारतीय स्टेट बँक | ३४७०५८५३/- | उपलब्ध झाले नाही | - |
| १२ | १०२५४४१९०८५ | भारतीय स्टेट बँक | १७५८७१६९/- | उपलब्ध झाले नाही | - |
| १३ | ७५२९४६४७३ | इंडियन बँक | २५४४५८०/- | ७२८०७७१०/- | ७०२६३१३० |
| १४ | ००८५२०१००००७३९४ | बँक ऑफ इंडिया | ४६०३६६४२.६७ | ३०६६८४१८.९०/- | १५३६८२२३.७७ |
| १५ | ००८५२०१००००८०९९ | बँक ऑफ इंडिया | १०२०४५/- | २३७३३९.५६/- | १३५२४४५६ |
| १६ | ३०३५००२६२१० | भारतीय स्टेट बँक | २५३६३४५/- | उपलब्ध झाले नाही | - |
| १७ | ०१५७११००२३२१ | देना बँक | ८७५९२७१.२६/- | ५९०३०२७३.३१/- | ५०२७११०२.०५ |
| १८ | ९१२०१००६८२०६७२० | Axis Bank | ११५९९२७७२/- | १४४२००९४७.४८/- | २८२०८१७५.४८ |

लेखा विभागातील सर्व साधारण रोख नोंदवहीतील संबंधी वर नमुद केलेल्या बँकामधील अखेरची बँक पासबुकामधील शिल्लक व सर्व साधारण रोख वहीतील शिल्लक याचा ताळमेळ घेणे जरुरी आहे. परंतु प्रत्यक्षात विवरण पत्रानुसार ताळमेळ घेतल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे सर्व साधारण रोख वहीत शिल्लक्याची लेखा परीक्षणास पडताळणी करता आली नाही. तसेच वरील तक्त्यातील अनुक्रमांक ११,१२ व १६ या बँकेतील पासबुक उपलब्ध करण्यात आलेले नाही. याबाबत खुलासा करण्यात आलेला नाही.

**आक्षेप क्र ३.४ :- स्टेट बँक अकाउन्ट नं-१०२५४४१९०६३ या अकाउन्ट मध्ये सन-२०१४-१५ मध्ये जमा केलेले चेक परत आल्याबाबत..**

वरील संदर्भिय बँक अकाउन्ट च्या स्टेट्मेन्ट ची पडताळणी केली असता खालील चेक परत आल्याचे दिसुन येतात.

| अ.क्र | चेक नं | दिनांक | रक्कम रु. |
|---|---|---|---|
| १ | ८३२६११ | १४/०३/२०१५ | २५०/- |
| २ | १०३४८३ | १९/०३/२०१५ | १४५००/- |
vi) गुरुदत्ता अ म्हात्रे, खाते क्र.११६७ यांच्या खात्यात आरंभीची शिल्लक ४३९७३ रु. असुन एप्रिल२०१४ ते मार्च२०१५ पर्यंत खात्यामध्ये रक्कम जमा झाल्याचे दिसुन येत नाही . परंतु नोव्हेंबर २०१४ या महिन्यात ३०००० रु. खात्यामधुन उचल केलेले दिसुन येते तरी, खात्यात एप्रिल२०१४ ते मार्च २०१५ पर्यंत रक्कम जमा का झाली नाही याचा खुलासा लेखा परिक्षणास करण्यात आलेला नाही.

**आक्षेप क्र ११.४:- भविष्यनिर्वाह निधी (नमुना नं-९९)**

भविष्य निर्वाह निधी खाते वही ( नमुना नं-९९) सन २०१४-१५ चे अवलोकन केले असता एकुण- ८३ खातेदाराचे प्रारंभिची रक्कम आहे तिच रक्कम मार्च अखेर दर्शविण्यात आलेली आहे. यावरून असे लक्षात येते कि, सभासद खातेदार हे सध्या सेवेत दिसुन येत नाही . तरी पण त्यांच्या खात्याचा हिशोब देण्यात आलेला नाही . त्याची माहिती खालील तक्त्याप्रमाणे आहे.

| अ.क्र | भविष्य निर्वाह खाते क्र. | सभासदाचे नाव | एप्रिल २०१४ ची आरंभीची शिल्लक व मार्च २०१५ अखेरची शिल्लक (रु.) |
|---|---|---|---|
| १ | ४९ | कनुमंगल | ८९५ |
| २ | १२१ | जगन्नाथ चंदनशिवे | १९५८१५ |
| ३ | १४८ | जयंती कालु | २१४२ |
| ४ | १५३ | आरमोगन नारायण | ६२१ |
| ५ | १७४ | रावजी मंगल | ३१०६ |
| ६ | १७५ | रामशरण टाक | ७४१६ |
| ७ | १७७ | लक्षमन टाक | ६४६४ |
| ८ | १७९ | कानु सोमा पुरोबिया | १६०७९० |
| ९ | १८४ | मोहन अडिवल | २३५ |
| १० | १७५ | रामेश्वर कल्याणा | ११४१० |
| ११ | २०९ | बाबुशंकर सोलंकी | १५२२६६ |
| १२ | २१६ | | ७४५९ |
| १३ | २३२ | रामलिंगम नडेसन | ३५५०३ |
| १४ | २३४ | बाबु कोटियाना | ६६८५ |
| १५ | २३७ | भिकु हिराजी सोलंकी | ७६२८६ |
| १६ | २४५ | | ३८१८ |
| १७ | २४८ | मृत्युक्रिष्णा (mrutyukrishna) तंगवेल | ३३६ |
| १८ | २५६ | मंगल चुना सोलंकी | ८५३५ |
| १९ | २६२ | सना मंगल सोलंकी | ४७३ |
| २० | २९० | रामस्वामी अमावंशी | १०९७२९ |
| २१ | २९६ | | २५५४ |
| २२ | ३०० | आर्मुगम मनीकम | ११५४४६ |
| २३ | ३२२ | | १५९३४ |
| २४ | ३३१ | सत्यपाल दिलीप | ३१६४७ |
| २५ | ३४१ | | ३६१८ |
| २६ | ३४५ | बिरांपल रघुनाथ | १२७८९९ |
| २७ | ३६० | | १३१३ |
| २८ | ३७४ | मोनिका तांबे | १३८८ |
| २९ | ३७६ | सुनील यादव | २३४११४ |
| ३० | ३९८ | विपुल क्षीरसागर | १५१६६४ |
| ३१ | ४१८ | | ९७३ |
| ३२ | ४४१ | राजन गुरव | ४३८६१ |
| ३३ | ४६० | काशीनाथ श्रीनिवास | ६१९० |
| ३४ | ४८६ | क्रिष्णन अर्मुगम | २३६२३४ |

| | | | |
|---|---|---|---|
| ३५ | ४८८ | | २४९७ |
| ३६ | ४९० | | ३५४४८ |
| ३७ | ४९१ | | ४०३१० |
| ३८ | ४९५ | | ३३२६२ |
| ३९ | ५०७ | मोहन सक्रा सोलंकी | ७९१३५ |
| ४० | ५१७ | | ३७९२ |
| ४१ | ५४५ | कोलांजी कुप्पुस्वामी | ३६५८७ |
| ४२ | ५४८ | कली भिका | २१२२ |
| ४३ | ५५७ | मोहन पी. सोलंकी | ३६९७ |
| ४४ | ५७३ | अनील पत्रे | २१३६८ |
| ४५ | ५७४ | मोहन नाईक | ८९८ |
| ४६ | ५७५ | सुनील चतुरे | ११९१९३ |
| ४७ | ५८७ | गोपाल खंडवी | ८०६८२ |
| ४८ | ५९२ | दिनेश डी. गोहिल | ५३३६० |
| ४९ | ६८१ | छाया अ. अल्हाट | ८०३२४ |
| ५० | ६९३ | वंदना वाकोडे | १२७३२ |
| ५१ | ७१९ | सविता भिकू | १२४३ |
| ५२ | ७२१ | शांती पनीर | १८२२५ |
| ५३ | ७२४ | संजय रामा पवार | ६०० |
| ५४ | ७३० | अय्यास्वामी नडेसन | ८४४१५ |
| ५५ | ७६५ | सिन्नापयान रामस्वामी | ४३३ |
| ५६ | ७७४ | महादेव बी.पाटिल | २३०० |
| ५७ | ७७५ | सुभाष घरत | २९७८ |
| ५८ | ७७७ | अनपयागन अयाकंडु | २८९२ |
| ५९ | ७९४ | करमवीर वाल्मिकी | ११०२९ |
| ६० | ८१५ | जगदीश म. पाटिल | ५९७१२ |
| ६१ | ९५८ | हरिश्चंद्र मांगेला | ८६०५१ |
| ६२ | १०३८ | बाळकृष्ण डोके | ९३६८ |
| ६३ | १०५३ | जयरामन वेलेयान | २११४५ |
| ६४ | १०५९ | देवानंद कृष्ण भोईर | ३०७९६ |
| ६५ | १०७७ | अब्दुल करमसिंग | ८४१ |
| ६६ | १०८७ | दिलबाग महेश्वरी | ४६४०५ |
| ६७ | १११० | विलास एस. गायकवाड | ९३६० |
| ६८ | ११२६ | राजु नंदलाल वैती | ९०७५६ |
| ६९ | १२०४ | भाईनाथ के अजमन | १८०३ |
| ७० | १२५१ | भरत जगताप | ८३८३७ |
| ७१ | १२७२ | हनुमान एस. पाटील | २०४० |

| | | | |
|---|---|---|---|
| ७२ | १३०८ | संजय खरे | ५६० |
| ७३ | १३३९ | चंद्रकांत टोपले | ५७०५ |
| ७४ | १३४२ | प्रविण भोये | १९५७५ |
| ७५ | १३४५ | अनिल के.वंजारी | ४०४२४ |
| ७६ | १३५२ | सचिन चवाठे | ७१९४९ |
| ७७ | १३६३ | मोहन सोमा तलपे | ६३७४५ |
| ७८ | १३८७ | निशांत जाधव | १०७१४७ |
| ७९ | १४०६ | शशिकांत मते | १८७ |
| ८० | १४०९ | अशोक सुरजीत हुशारा | १५०० |
| ८१ | १४२५ | संपत क्रिष्णा माधवन | २९४८७ |
| ८२ | १४३३ | अशोक लाडके (A3) | २३६२६ |
| ८३ | | विरमनी कोलानजी **(A13)** फालसे | ९०० |

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता एकुण- ८३ खाते दाराचे अंतिम देयके प्रलंबित असुन ते किती वर्ष प्रलंबित आहे त्याची माहिती व खातेदाराचे अंतिम देयक का देण्यात आले नाही त्याचा खुलासा लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेला नाही . तरी याबाबत खुलासा अप्राप्त आहे.

**आक्षेप क्र.११.५:- सन २०१४-१५ मधील भविष्यनिर्वाह निधीवरील व्याजाच्या रक्कमेबाबत..**

मिरा भाईंदर महानगरपालिका कर्मचा- य़ांच्या मासिक भविष्य निर्वाह निधी पुस्तक नोंदवही नमुना क्र.१०० ठेवलेली असुन सन २०१४-१५ ची तपासणी केली असता कर्मचा- य़ांना द्यावे लागणारे व्याज व निधीवर मिळणारे व्याज यामध्ये मोठा फरक खालील प्रमाणे आढळुन आला.

| अ.क्र | कर्मचा-यांना अदा करावयाचे व्याज (रु.) | बँकेत ठेवलेले ठेवी वरील व्याज (रु.) | फरक (रु.) |
|---|---|---|---|
| **१** | **१,९७,९५,५९०** | **१४८२७८९७** | **४९६९६९३** |

सदर रक्कम भरुन काढण्याबाबत महासभेस प्रस्ताव सादर करणे आवश्यक होते. परंतु सदर प्रस्ताव सादर केल्याबाबतची कागदपत्रे लेखापरीक्षणास प्राप्त झाली नाही . तरी अशा प्रकारे महासभेस सादर केलेल्या प्रस्तावाची कागदपत्रे लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेली नाही . याचा खुलासा करावा.

**आक्षेप क्र.११.६:- सेवा पुस्तकातील अनियमितता.....**

आस्थापना विभागातील सेवा पुस्तकाची तपासणी करताना खालील त्रुटी आढळुन आल्या.

१) वार्षिक वेतनवाढ रकाना क्र.८ मध्ये संबंधित कर्मचा-याची स्वाक्षरी नसुन हाताचे ठसे, हक्क रजा व वैद्यकीय रजा यांच्या नोंदी अद्यावत केलेल्या नाही.

२) सेवापुस्तकामध्ये सेवा पडताळणी अभिलेख अद्यावत केलेले नाही.

३) सेवा पुस्तकातील वेतन निश्चितीच्या नोंदी प्रमाणित करण्यात आलेल्या नाही.

तसेच खालील कर्मचा- यांच्या वेतनाचे स्लीप व सेवा पुस्तक यांची पडताळणी केली असता खालील प्रमाणे त्रुटी आढळुन आल्या.

१) श्री.गिल्बर्ट बोर्जिस एम्प्लॉयमेन्ट कोड नं- ०००१२३, बँक अकाउन्ट नं- १०२५४४७२६१७ सेवापुस्तकातील रजेच्या नोंदी तपासल्या असता रजेच्या नोंदी आढळुन आल्या नाहीत . तथापि, नोव्हेंबर २०१४ च्या वेतन स्लीप तपासुन पाहिली असता वेतन काढल्याचे दिसुन येत नाही. जर कर्मचारी गैरहजर असतील किंवा रजेवर असेल तर तशी नोंद सेवापुस्तकावर करणे आवश्यक आहे. परंतु सदरील नोंदी सेवापुस्तकात आढळुन आल्या नाहीत.

२) श्री.राजेन्द्र मृत्यन एम्प्लॉयमेन्ट कोड नं-०००५०१, सेवापुस्तकातील रजेच्या नोंदी तपासल्या असता रजेच्या नोंदी आढळुन आल्या नाही. परंतु नोव्हेंबर २०१४ व डिसेंबर २०१५ च्या वेतन स्लीप तपासुन पाहिले असता वेतन काढल्याचे आढळुन येत नाही . जर कर्मचारी गैरहजर असतील किंवा रजेवर असेल तर तशी नोंद सेवापुस्तकावर करणे आवश्यक आहे . परंतु सदरील नोंदी सेवापुस्तकात आढळुन आल्या नाही.

३) श्री.प्रेमनाथ वसंत ठाकरे एम्प्लॉयमेन्ट कोड नं-००१२७४ बँक अकाउन्ट नं- १०२५४४९५७०४ सेवा पुस्तकात खालीलप्रमाणे रजेच्या नोंदी आढळुन येतात.

i) १६/०९/२०१३ ते २८/०९/२०१३ (१३ दिवस) वैद्यकीय रजा

ii) २८/१०/२०१३ ते १८/११/२०१३ (E.L)

iii) ०२/०५/२०१४ टे ०५/०६/२०१४ (३४ दिवस) वैद्यकीय रजा

iv) ०१/१०/२०१४ ते १८/०१/२०१५ (१११ दिवस E.L)

v) ०९/०३/२०१५ ते ३१/०३/२०१५ (२३ दिवस E.L)

vi) २८/०१/२०१६ ते २२/०२/२०१६ (E.L)

वरीलप्रमाणे रजा मंजुर असताना कर्मचा-यास जुलै २०१४ ते जानेवारी २०१५ या महिन्याच्या वेतन स्लीप तपासुन पाहिले असता वेतन काढल्याचे दिसुन येत नाही. तरी सदर कर्मचा-याचे वेतन का काढण्यात आले नाही याचा लेखापरीक्षणास खुलासा सादर करण्यात यावा.

४) श्री. सुनील सखाराम डौला एम्प्लॉयमेन्ट कोड नं- ००१२८१ (मजुर) बँक अकाउन्ट नं- १०२५४४९४८४६. सेवा पुस्तकात खालीलप्रमाणे रजेच्या नोंदी आढळुन येतात.

i) २०/०२/०२०१४ ते ०१/०३/२०१४ (१३ दिवस E.L)

ii) २६/०३/२०१४ ते २९/०३/२०१४ (४ दिवस E.L)

iii) १९/०५/२०१४ ते २३/०५/२०१४ (५ दिवस E.L)

iv) १६/०७/२०१४ ते २५/०७/२०१४ (१० दिवस E.L)

वरीलप्रमाणे रजा मंजुर असताना कर्मचा-याचा रजेचा पगार दिल्याच्या नोंदी सेवापुस्तकात आढळुन येत नाही. तसेच सप्टेंबर २०१४ ते जानेवारी २०१५ या महिन्याच्या वेतन स्लीप तपासुन पाहिले असता वेतन काढल्याचे आढळुन येत नाही व सेवा पुस्तकामध्ये रजा किंवा गैरहजेरीच्या नोंदी आढळुन येत नाही. तरी, सदर कर्मचा-ऱ्या चा वेतन का काढण्यात आले नाही याचा लेखापरीक्षणास खुलासा सादर करण्यात यावा.

५) आल्फ्रेड डिसोजा एम्प्लॉयमेन्ट कोड नं- ०००४१३ (शिपाई) बँक अकाउन्ट नं- ००००००१०२५४४७७४१२ पी.एफ नं- ०००४१३. जुलै २०१४ ते आक्टोंबर २०१४ पर्यंत वेतन काढण्यात आले नाही. दि.०७/०६/२०१५ मयत सेवा पुस्तकातील नोंदी प्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८७ चे कलम ७९ परिशिष्ठ नियम (३) पोटनियम वैदयकीय प्रमाणपत्राच्या आधारे जुलै २०१४ पासुन असाधारण रजा जा.क्र. मनपा/आस्था/९९५१/२०१४ दि.०७/११/२०१४ प्रमाणे पक्षघात रजा मंजुर करण्यास आली होती. त्यामुळे कर्मचा-यास रजेच्या काळात वेतन लागु होते.

माहे नोव्हेंबर २०१४ च्या वेतनाच्या स्लीप वरुन जुलै २०१४ पासुन ते नोव्हेंबर २०१४ पर्यंत जुलैची वेतन वाढ धरुन ( मुळ वेतन - ७९४०) एकुण रु.१,१२,९९८/- वेतन देण्यात आले आहे . कर्मचारी १ जुलै पासुन रजेवर असल्या कारणाने त्याला जुलै २०१४ च्या वेतनवाढीचा (Increment) लाभ देय होत नाही . तसेच कर्माचा-यास रजेच्या कालावधीत प्रवासभत्ता व कपडे धुलाईचा लाभ मिळत नाही . त्यामुळे कर्मचा-यास जुलै-२०१४ पासुन ते त्याच्या मृत्यु पर्यंत म्हणजेच दि.०७/०६/२०१५ पर्यंत जास्त वेतन देण्यात आलेला आहे. अशी या विभागाची धारणा आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | | देय वेतन (रु) | अदा केलेले वेतन (रु) | १ महिन्याची रक्कम (रु) | ५ महिन्याची रक्कम (रु) |
|---|---|---|---|---|---|
| १ | मुळ वेतन | ७,६७० | ७,९४० | २७० | १३५० |
| २ | ग्रेड पे | १३०० | १३०० | - | - |
| ३ | महागाई भत्ता | ८९७० | ९२४० | २७० | १३५० |
| ४ | स्थानिक भत्ता | २०० | २०० | - | - |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | घरभाडे भत्ता | २७७२ | २७७२ | - | - |
| ६ | कपडे धुलाई भत्ता | - | ३० | ३० | १५० |
| ७ | प्रवास भत्ता | - | ४०० | ४०० | २००० |
| ८ | इतर भत्ते | ३५८८ | ३५८८ | - | - |
| | एकुण | २४५०० | २५४७० | ९७० | ४८५० |

याबाबत वरील मुद्द्यांची खात्री करुन योग्य ती कार्यवाही करुन तसा खुलासा लेखापरीक्षणास सादर करणेबाबत अर्धसमासाद्वारे कळविण्यात आले होते . तथापि, खुलासा अप्राप्त आहे.

# वाहन विभाग

**आक्षेप क्र. १२.१ :- डिझेल व पेट्रोलच्या हिशोबाबाबत..**

महाराष्ट्र नगरपरीषद लेखा संहिता १९७१ मधील नियम क्र .१५३ अन्वये नमुना क्र .१२६ मध्ये पेट्रोलचा हिशेब ठेवला पाहिजे . नियंत्रण अधिका- यास, पेट्रोल वापरावर होणा- या खर्चाचे परिनिरीक्षण करता यावे म्हणुन नमुना क्रमांक १२६/१२७ प्रमाणे मोटार वाहन लेखापुस्तक ठेवले पाहिजे सन २०१४-१५ चे लेखापरीक्षण समयी सदर अभिलेख्यांचे अवलोकन केले असता दर महीन्याला किती पेट्रोल डिझेल घेतले त्याची नोंद घेण्यात आल्याची दिसुन येते , तसेच दर महीन्याला गोषवारा काढण्यात आल्याचे आढळुन आले परंतु त्या गोषवा- यावरती नियंत्रण अधिका- याच्या सह्या आढळुन आल्या नाही. त्यामुळे गोषवा-याची सत्यता लेखापरीक्षणास पडताळुन पाहता आली.

याबाबत विभागास अनुपालन सादर करण्याबाबत सुचीत करण्यात आले होते . परंतु अनुपालन अप्राप्त आहे.

**आक्षेप क्र. १२.२ :- घसारा नोंदवही न ठेवले बाबत...**

महाराष्ट्र नगरपरीषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र .१५६ मधील तरतुदीनुसार मनपाच्या वाहनांची वार्षिक पडताळणी करुन तसे केल्याचे प्रमाणित करणे आवश्यक असते व घसारा नोंदवही ठेवुन मालमत्तेची वर्षा अखेरची किंमत काढणे आवश्यक आहे . परंतु अशी कार्यवाही विभागाकडुन झालेली नाही.

सन२०१४-१५ या वित्तीय वर्षामध्ये वाहन विभागाचे नस्त्यांचे अवलोकन केले असता विशेष निधी व घसारा निधी मनपाच्या वाहनांचा काढण्यात आलेला नाही.

याबाबत विभागास अनुपालन सादर करण्याबाबत सुचित करण्यात आले होते . परंतु अनुपालन अप्राप्त आहे.

# परिवहन विभाग

**आक्षेप क्र.१३.१:- अभिलेख व माहिती उपलब्ध न करणेबाबत..**

सन-२०१४-१५ या वित्तीय वर्षातील लेखापरीक्षणास खालीलप्रमाणे माहिती व अभिलेख उपलब्ध करुन देण्याबाबत अर्धसमासपत्र देण्यात आले आहे.

१. सन २०१४-५ या वितीय वर्षातील जमा/ खर्च विविरण पत्र व बँकमेळ पत्रक सादर करावे.
२. निविदा / दरपत्रकांच्या मुळ नस्ती फाईल्स.
३. परिवहन उपक्रमास दिलेल्या अनुदानाची नोंद वही
४. सन २०१४-१५ या वित्तीय वर्षातील रोकडवही , जमा/ खर्च वर्गीकरण रजिस्टर्स सादर कारावीत.
५. जंगम मालमत्ता (नमुना नं-११४) रजिस्टर
६. साठा रजिस्टर (नमुना नं-११६)
७. परिवहन उपक्रमाबाबत विभागातुन झालेले ठेकेदारांसोबत सर्व करारनामे प्रत
८. परिवहन विभागात झालेले सर्व करारनामे
९. किरकोळ पावती पुस्तके, पोटकिर्द व चलम फाईल.
१०. बँक स्टेट्मेट (पासबुक इत्यादी) बँकेत भरणा केल्याबाबत सविस्तर माहिती
११. सन २०१४-१५ पर्यंत किती स्वामित्य धनाचा भरणा केल्या त्याचा तपशिल
१२. परिवहन उपक्रमासाठी नेमणुक केलेल्या कर्मचा- यांच्या पी.एफ. व ई.एस.आय.सी बाबतचा तपशिल/
१३. सर्विस टॅक्स (सेवा कर) चा भरणा केल्याचा तपशिल
१४. ट्रीप कार्ड व दैनंदीनी कि.मी नोंदवही (लॉग बुक)
१५. प्रत्येक वाहनाचे इतिहास पुस्तक (History Sheet)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०५(२) व अनुसुची 'ड' प्रकरण दोन मधील नियम ६(२) व ७ नुसार लेखापरीक्षणा करीता विभागाने संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे. परंतु संबंधित विभागाने याबाबत कार्यवाही केलेली नाही . त्यामुळे वरील आक्षेप कायम करण्यात येत आहेत.

# विधी विभाग

**आक्षेप क्र.१४.१:- विधी विभागातील झेरॉक्स साठी झालेला खर्च रक्कम रु.७९६६५.**

विधी विभागातील अभियोक्ता यांचे देयक रजिस्टर व देयके यांचे लेखापरिक्षण करीत असताना फक्त झेरॉक्स साठी रु.७९६६५ खर्च करण्यात आलेले आहे. त्याची माहीती खालील प्रमाणे.

| देयक रजिस्टर क्र. | अभियोक्त्यांचे नाव | दिनांक | एकुण देयकाची रक्कम | झेरोक्स देयकाची रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| ३ | सौ. सई वडके (विधी अधिकारी) (झेरोक्स बील) | १९/०५/२०१४ | ७८३४/- | ५१३३ | साई सिध्दि झेरॉक्स |
| ५ | सौ. सई वडके (विधी अधिकारी) (झेरोक्स बील) एप्रिल-२०१४ | २१/०५/२०१४ | ७२००/- | ६८७८ | साई सिध्दि झेरॉक्स |
| ६ | सौ. सई वडके (विधी अधिकारी) (झेरोक्स बील)-मार्च-२०१४ | २७/०५/२०१४ | ९४९३/- | ८६७५ | साई सिध्दि झेरॉक्स |
| ७ | सौ. सई वडके (विधी अधिकारी) (झेरोक्स बील) एप्रिल-२०१४ | ३१/०५/२०१४ | २३८०/- | १७७९.५ | श्री.सिध्दी विनायक महिला बचत गट |
| ८ | सौ. सई वडके (विधी अधिकारी) (झेरोक्स बील) | ०५/०७/२०१४ | ५७४०/- | ५५३९ | साई सिध्दि झेरॉक्स |
| १० | सौ. सई वडके (विधी अधिकारी) (झेरोक्स बील) | १९/०७/२०१४ | १०३७४/- | ५९७४ | साई सिध्दि झेरॉक्स |
| १५ | सौ. सई वडके (विधी अधिकारी) (झेरोक्स बील) | १३/०८/२०१४ | ८८९५/- | ८०९४.७५ | साई सिध्दि झेरॉक्स |
| १८ | सौ. सई वडके (विधी अधिकारी) (झेरोक्स बील) | ३१/१०/२०१४ | १८६९७/- | १२३१७ | साई सिध्दि झेरॉक्स |
| २२ | सौ. सई वडके (विधी अधिकारी) (झेरोक्स बील) | १८/११/२०१४ | ८५१५/- | ७६१५ | साई सिध्दि झेरॉक्स |
| २७ | सौ. सई वडके (विधी अधिकारी) (झेरोक्स बील) नोव्हें-२०१४ | १९/१२/२०१४ | १११२५/- | ५३६८ | साई सिध्दि झेरॉक्स |
| ३१ | सौ. सई वडके (विधी अधिकारी) (झेरोक्स बील)-डिसें-२०१४ | ०३/०२/२०१५ | ७९५४/- | ४७५४ | साई सिध्दि झेरॉक्स |
| ३५ | सौ. सई वडके (विधी अधिकारी) (झेरोक्स बील) | १८/०२/२०१५ | ७७३८/- | ७५३८ | साई सिध्दि झेरॉक्स |
| **एकुण** | | | **१०५९४५/-** | **७९६६५.२५** | |

वरील देयकाच्या यादीची अवलोकन केले असता असे आढळुन आले आहेत की , सर्व झेरॉक्स चे कामे साई सिध्दी झेरॉक्स सेंटर कडुन साधारण १ रु. प्रमाणे झेरॉक्स प्रती काढण्यात आलेले आहे. ५००० पेक्षा जास्तीचे खरेदी किंवा कामे वर्षातुन करावयाची असल्यास किमान ३ कोटेशन मागविणे व कमीतकमी दरात काम करण्याला करारनामा करून काम करणे उचित ठरले असते. परंतु, तसे करण्यात आले नाही.

२) प्रत्येक बील अवलोकन केले असता साधारण झेरॉक्स च्या प्रती ७९००० च्या वर काढण्यात आलेल्या आहे. परंतु देयकात दिलेल्या माहितीत त्याचा काय वापर केला याचा उल्लेख दिसुन येत नाही.

३) साधारण चांगल्या प्रतीच्या झेरॉक्स मशीनला खरेदी करण्यासाठी ३०००० ते ३५००० रु. एवढा खर्च येतो. महानगरपालिकेच्या विधी विभागात प्रचंड प्रमाणात दरवर्षी वरील प्रमाणे खर्च झालेला दिसुन येत आहे . आणि हा दर वर्षाचा खर्च असल्याने विधी विभागाने झे रॉक्स मशीन खरेदी करण्यासाठी प्रस्ताव का करण्या त आला नाही याचा खुलासा विभागाने लेखापरीक्षणास सादर करण्यात आलेला नाही.

# सार्वजानिक आरोग्य विभाग

**आक्षेप क्र.१५.१ :- लेखापरिक्षणास अभिलेख व माहिती उपलब्ध करुन न देण्याबाबत....**

आरोग्य विभागाचे (घनकचरा) चे सन २०१४-१५ या वित्तीय वर्षातील आरोग्य (साफसफाई) विभागातील अभिलेख व माहिती खालीलप्रमाणे उपलब्ध करुन देण्यासाठी अर्धसमास क्र.०१ देण्यात आला होता.(जुलै २०१७).

(रु.लक्ष मध्ये)

| अ. क्र | लेखाशिर्ष | कोड नं | अर्थसंकल्पीय तरतुद | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | स्थायी आस्थापना | २११० | २०७२.४७ | १९२७.७२ |
| ३ | वार्ड साफसफाई/ नाले सफाई,खोदाई | २५५० | ४९२०.०० | १८१२.१४ |
| ५ | पर्यावरण अहवाल बनविणे | २२२५ | १०.०० | ९.०५ |

अर्धसमास क्र.०५ (सप्टेंबर-१७) नुसार स्मरण पत्र सुद्धा देण्यात आले होते . व वारंवार प्रत्यक्ष भेटुन वरिल तक्त्यातील लेखे व नोंदवह्या त्वरीत लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यासाठी कळविले होते . परंतु विभागाकडुन माहिती व अभिलेखे उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही . महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०५ (२) व अनुसुची 'ड' प्रकरण ३(२) मधील नियम ६(२) व ७ नुसार लेखापरीक्षणा करीता उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे. परंतु संबंधित विभागाने याबाबतची कार्यवाही केलेली नाही.

**आक्षेप क्र.१५.२:- किटकनाशके / एकात्मीक डास निर्मुलन योजना-**

सन २०१४-१५ या वर्षात सार्व . आरोग्य किटकनाशके / एकात्मीक डास निर्मुलन योजने करीता रु २३०.०० लक्ष इतकी तरतु द करण्यात आली होती . सदर तरतुदी अंतर्गत सार्व .आरोग्य विभागाने रु.२२७.२० लक्ष इतक्या रक्कमेची औषधे खरेदी केलेली आहेत. मात्र विभागाने कोणती औषधे किती खरेदी केली व कोणत्या ठिकाणी फवारणी केली याबाबतचा अभिलेख तपासणी करीता उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०५ (२) व अनुसुची 'ड' प्रकरण ३(२) मधील नियम ६(२) व ७ नुसार लेखापरीक्षणा करीता उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे . परंतु याबाबतचा तपशिल लेखापरीक्षणास सादर केलेला नाही.

**आक्षेप क्र. १५.३:- पावती पुस्तक साठा नोंदवही बाबत...**

सन २०१४-१५ ह्या वित्तीय वर्षामध्ये सार्व .आरोग्य विभागामधील पावती पुस्तक साठा नोंदवहीची तपासणी केली असता विभागाने भांडार विभागाकडुन घेतलेल्या पावती पुस्तकांची नोंद साठा रजिस्टर मध्ये नोंदवली आहे. परंतु नोंदी अद्यावत नसुन त्यावर विभाग प्रमुखांची स्वाक्षरी व शिक्का नाही तसेच प्रमाणित केलेले नाही. तरी पुर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

**आक्षेप क्र.१५.४ :- शुल्क आकारणी पावती पुस्तक छ्पाईच्या अनियमिततेबाबत:-**

मिरा भाईंदर महानगरपालिका आरोग्य विभागाने स्वच्छता व आरोग्य उपविधी शुल्क आकारणीसाठी पावती पुस्तके विभागांतर्गत छापुन घेण्यात आलेली आहेत. वास्तविक सदरील पावती पुस्तके भांडार विभागातुन मागणी करणे गरजेचे असताना विभागाने तसे मागणी केल्याचे लेखापरीक्षणास आढळुन येत नाही तसेच सदर पावती पुस्तकावर मनपाचा शिक्का व पावती पुस्तके प्रमाणित केल्याचे आढळुन येत नाही. याबाबत किती पुस्तके छापली व कोणत्या नियमांतर्गत अशी पुस्तके छापलेली आहे त व त्यासाठी आयुक्तांची मंजुरी घेण्यात आली होती का ? याबाबत अर्धसमासाव्दारे खुलासा मागविण्यात आला होता. परंतु खुलासा सादर करण्यात आलेला नाही.

**आक्षेप क्र.१५.५:- अप्राप्त पावती पुस्तकांबाबत....**

भांडार विभागाकडुन घनकचरा व्यवस्थापन फी वसुली साठी पावती पुस्तके उपलब्ध करुन देण्यात आली होती . परंतु साठा रजिस्टर तपासताना भांडार विभागाकडुन उपल्ब्ध करुन देण्यात आलेल्या पावती पुस्तकांपैकी (घनकचरा व्यवस्थापन फी) पावती पुस्तक क्र . २०८, २०१, २१३, २३७, २४३ ,२४६, २४८, २५०, २५१, २२२, २२९ याची नोंद विभागाच्या साठा रजिस्टर मध्ये

आढळुन येत नाही . तरी वरील पुस्तके वसुली साठी वापरली असल्यास किंवा कोरी असल्यास लेखापरीक्षणास तपासणीसाठी उपलब्ध करुन देणेबाबत अर्धसमासाव्दारे कळविण्यात आले होते . तसेच साठा नोंदवहीमध्ये वरील पुस्तकांची नोंद का घेण्यात आली नाही याबाबतचा खुलासा मागविण्यात आला होता.

वरील पुस्तके लेखापरीक्षणा करीता उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही . यामुळे सदर पुस्तके गहाळ झाली असल्याची शंका निर्माण होते. तसेच पुस्तकांच्या नोंदीबाबतही खुलासा सादर करण्यात आलेला नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०५(२) व अनुसुची 'ड' प्रकरण ३ दोन मधील नियम ६ (२) व ७ नुसार लेखापरीक्षणा करिता विभागाने संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे.

**आक्षेप क्र.१५.६:- पोटकिर्दवर / पावती पुस्तकांवर स्वाक्षरी नसणे बाबत....**

१) पा क्र . ०१९९०१ ते ०१९९०९ पर्यंतच्या पावत्या दि . ०२/०४/२०१४ मुर्धे ते उत्तन प्रभाग घनकचरा व्यवस्थापन फी किरकोळ पावती पुस्तकांतील पावत्यावर लिपिकाची स्वाक्षरी नाही.

२) पा.पु.क्र.२४२/२४१६० व २४१६१ दि. ३१/०३/२०१५ रक्कम रु.१५००/- व रु. ३३००/- पोटकिर्द मध्ये नोंद घेतली नाही.

३) जनता नगर भाईंदर (प). पा.पु.क्र. २०० अशी दिनांकाची नोंद असुन पावतीवर मार्च (मागील बाकी) अशी नोंद केलेली आहे. परंतु सदरच्या पावत्या सन २०१४-१५ च्या पोटकिर्दमध्ये नोंदविलेल्या नाहीत. सदर एकुण रक्कम रु.२७००/- बाबत खुलासा मागविण्यात आला होता.

४) जनता नगर भाईंदर (प) प्रभागाने प्रत्येक दिवसाची पोट्किर्दावर (घनकचरा फि) रक्कमाची बेरीज केलेली नसुन प्रत्येक दिवसाची पोटकिर्द स्वतंत्र पानावर लिहिलेली नाही.

५) नवघर, शांतीनगर, मिरारोड या प्रभागाच्या घनकचरा व्यवस्थापन पोट्किर्द्वर मनपाचे गोल सील नसुन पोट्किर्द प्रमाणित केलेली नाही.

६) नवघर पोटकिर्द पा.पु.क्र. २३०/२३००० क्रमांकाच्या दोन्ही प्रती (छायाप्रत + मुळ पावती) पावती पुस्तकांमध्ये नाही.

७) नवघर पोटकिर्द पा.पु.क्र.२३६/२३६०० क्रमांकाच्य नोंदी प्रती (छायाप्रत + मुळ पावती) पावती पुस्तकांमध्ये नाही.

८) विनायक नगर दि.२९/११/१४ रक्कम रु.१५००/- चलनावर स्वाक्षरी नाही. तसेच विनायक नगर प्रभागाची पोटकिर्द व वापरण्या त आलेली पावती पुस्तके लेखापरी क्षण विभागास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

याबाबत कोणतीही माहिती व दस्तऐवज सादर केलेला नाही . तसेच खुलासा अप्राप्त आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०५(२) व अनुसुची 'ड' प्रकरण ३ दोन मधील नियम ६ (२) व ७ नुसार लेखापरीक्षणा करिता विभागाने संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे.

# वैद्यकिय आरोग्य विभाग

**आक्षेप क्र.१६.१ :- लेखापरिक्षणास अभिलेख व माहिती उपलब्ध करुन देणेबाबत...**

आपल्या विभागाचे सन २०१४-१५ चे अंतर्गत लेखा परिक्षण २७ जुलै ते ०८ ऑगस्ट पर्यंत करण्यात आले आहे. लेखापरिक्षणासाठी सन २०१४-१५ या वित्तीय वर्षातील आरोग्य़ (लस टोचणी) विभागातील अभिलेख व माहिती खालीलप्रमाणे उपलब्ध करुन द्यावी.

| अ. क्र | लेखाशिर्ष | कोड नं | अर्थसंकल्पीय तरतुद | प्रत्यक्ष खर्च | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | आकस्मित खर्च | २२१९ | ५.०० | १.४९ | दर महिन्याच्या खर्चाची व देयकाप्रमाणे यादी व संबंधीत देयक,तसेच तररुद नोंदवही व स्टेशनरी व इतर खरेदीचा साठा नोंदवही लेखापरिक्षणास त्वरित सादर करणे. तसेच पोट्किर्द, पावती पुस्तक साठा रजिस्टर, पावती पुस्तके त्वरीत उपलब्ध करुन देणे. |
| २ | पल्स पोलिओ कार्यक्रम प्रचार | २५३२ | ४०.०० | ३२.५६ | |

वरिल तक्त्यातील लेखे व नोंदवह्या लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आलेले नाहीत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०५(२) व अनुसुची 'ड' प्रकरण ३ दोन मधील नियम ६ (२) व ७ नुसार लेखापरीक्षणा करिता विभागाने संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे. तथापि, याबाबतचा तपशिल लेखापरीक्षणास सादर केलेला नाही.

**आक्षेप क्र.१६.२ :- लेखापरिक्षणास अभिलेख व माहिती उपलब्ध करुन न दिल्याबाबत.....**

वैद्यकीय आरोग्य विभागाचे सन २०१४-१५ या वित्तीय वर्षातील आरोग्य विभागातील अभिलेख व माहिती खालीलप्रमाणे उपलब्ध करुन देण्यासाठी अर्धसमास क्र .०२ देण्यात आला होता.(जुलै २०१७).

(रु.लक्ष मध्ये)

| अ. क्र | लेखाशिर्ष | कोड नं | अर्थसंकल्पीय तरतुद | प्रत्यक्ष खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | स्थायी आस्थापना | २११० | ५२२.३३ | ५०४.३० |
| २ | अस्थायी आस्थापना | २११० | १५०.०० | ९९.१३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | कुटुंब नियोजन प्रचार व प्रसार | २७९० | ३.०० | ०.११ |
| ४ | आरोग्य विषयक कार्यक्रम हाती घेणे | २७४० | १०.०० | ८.४४ |
| ५ | शस्त्रक्रिया अनुदान(१/२ मुलींनंतर शस्त्रक्रिया( | | ३.०० | २.८० |
| ६ | स्टेशनरी, फर्निचर दुरुस्ती | २४८० | १०.०० | ४.५७ |
| ७ | रुग्णालये किरकोळ खरेदी/ देखभाल कामे | | १००.०० | ६८.०१ |

वारंवार प्रत्यक्ष भेटुन वरिल तक्त्यातील लेखे व नोंदवह्या त्वरीत लेखापरिक्षणास उपलब्ध करुन देण्यासाठी कळविले होते . परंतु विभागाकडुन माहिती व अभिलेखे उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०५ (२) व अनुसुची 'ड' प्रकरण ३(२) मधील नियम ६(२) व ७ नुसार लेखापरीक्षणा करीता उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे. परंतु संबंधित विभागाने याबाबतची कार्यवाही केलेली नाही.

**आक्षेप क्र.१६.३ :-लेखापरिक्षणास नुतनीकरणाचे अभिलेखे व माहिती उपलब्ध करुन देणेबाबत...**

१) लेखापरिक्षणास खालील नमुद केलेल्या खाजगी हॉस्पीटल नुतनीकरणा बाबतचे अभिलेखे व माहिती उपलब्ध करुन देणेबाबत विभागास कळविण्यात आले होते.

| अ.क्र | नाव |
|---|---|
| १ | डॉ.शरद्चंद्र सक्सेना |
| २ | डॉ. विणा जिंदाल |
| ३ | डॉ.सॅड्रा ड्रगो (डॉ. ड्रगो लाईफ लाईन हॉस्पीटल |
| ४ | डॉ. अनंत पुरोहीत |
| ५ | डॉ. जगदिश सिंह जुगरा |
| ६ | डॉ. अमरकुमार गुंजकर |
| ७ | श्री. सुबोध सागर सुरी |
| ८ | श्याम आय.ॲण्ड जनरल हॉस्पिटल |
| ९ | डॉ. रामकुमार शर्मा |
| १० | डॉ.आर आर शर्मा |
| ११ | डॉ. भाविका शेठ ( प्रमुख आर्युर्वेद भांडार) |
| १२ | डॉ.अरुण दुबे |
| १३ | डॉ. राम चव्हाण ( रिध्दी सिध्दी) |
| १४ | डॉ. राम तनवर |
| १५ | डॉ. नरेंद्र शर्मा |

| | |
|---|---|
| १६ | डॉ.आशुतोष पवार ( श्रीकृष्ण) |
| १८ | डॉ.महेश साळुंखे |
| १९ | डॉ.सिया राय |
| २० | डॉ.विरेन्द्र शुक्ला |
| २१ | डॉ.राजेन्द्रकुमार सक्सेना |
| २२ | डॉ. दिनेश शेट्टी ( ऑर्किट हॉस्पीटल) |
| २३ | डॉ.भरत कणसे (मंगलमुर्ती हॉस्पीटल) |
| २४ | डॉ. कांचन कणसे (साई कृपा हॉस्पीटल) |
| २५ | डॉ. संजय मेहेरा (गॅलॅक्सी हॉस्पीटल) |
| २६ | डॉ.आनंदकुमार पुरोहीत |
| २७ | डॉ. नरेन्द्र शर्मा ( रामलोक हॉस्पीटल) |
| २८ | डॉ.राज के सिंग (गायत्री हॉस्पीटल) |
| २९ | डॉ. संजीव रास गुप्ता |

२) मिरा भाईंदर महानगरपालिके अंतर्गत एकुण किती हॉस्पीटल व क्लिनिक आहेत ?

३) २०१४-१५ मध्ये किती हॉस्पीटल परवानगीचे नुतनीकरण केले व अजुन किती बाकी आहेत?
याबाबतची माहिती लेखापरीक्षणास उपलब्ध करुन देण्यात आली नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम १०५ (२) व अनुसुची 'ड' प्रकरण ३(२) मधील नियम ६(२) व ७ नुसार लेखापरीक्षणा करीता उपलब्ध करुन देणे अनिवार्य आहे. परंतु संबंधित विभागाने याबाबतची कार्यवाही केलेली नाही.

**आक्षेप क्र.१६.४:- करारनाम्याप्रमाणे कार्यवाही न केल्याबद्दल...**

कार्यादेश क्र. मनपा/वैद्यकीय/२३५/२३९/२०१४-१५ दि.२१/०५/२०१४ अन्वये मे. श्री सालासर बालाजी सप्लाय या ठेकेदारास विविध औषधे पुरविण्याचा ठेका देण्यात आला होता . त्याप्रमाणे अ क्र -०७ Tab.Cefadroxil 250 MG च्या ५०००० गोळ्यांची (१० गोळ्याचे पाकीट दर- रु. १३.७५) मागणी केली होती त्याप्रमाणे ठेकेदाराने ३४००० गोळ्या, बॅच नं- SMX-224, Mfd Dt- Oct-2013 Exp. Date-Sep-2015. पुरविल्याचे साठा रजिस्टर नमुना नं-११६ पृष्ठ क्र.०५ वर आढळुन येते.

औषधी भांडारातुन सदरील औषधाचा नमुना विश्लेषणसाठी शासकीय विश्लेषक औषध नियंत्रक प्रयोगशाळा मुंबई यांनी दि . १८/११/२०१४ रोजी घेतला होता . पत्र.क्र. NSR/MUM/48503/2015 Dt-08/01/2015 अन्वयेच्या विश्लेषण अहवालात औषधे हलक्या दर्जाचे (अप्रमाणित) असल्याचे घोषि त केलेले आहेत तसेच सदर बॅच मधील औषधे वापरावर बंदी घातलेली आहे.

सदर औषध पुरविण्याबाबत कार्यादेशावेळी ठेकेदारासोबत केलेल्या  करारनाम्यातील अट क्र.१२ नुसार पुरवठा केलेल्या बॅच मधील औषधाचा दर्जा हलक्या प्रतीचा (अप्रमाणित) आढळल्यास खालील प्रमाणे कारवाई करावयाची आहे.

A) Drug declared “Misbranded”, Adultreted” and spurious as per Drug and cosmetic act 1940 amended from time to time.

B) Drugs declared “Not of Standard Quality as per Drug and cosmetic act amended from time to time.

अशा वेळेला  सदरील ठेकेदाराचा ठेका रद्द करुन वापरलेल्या औषधाचा साठा विचारात न घेता खरेदीची किंमत ठेकेदाराकडुन त्यांच्या देयकामधुन व अनामत रक्कमेतुन वसुल केली जाईल . तसेच शिल्लक अप्रमाणित केलेले औषधे ठेकेदाराच्या उपस्थितीत किंवा  शासकीय विश्लेषक औषध नियंत्रक  यांच्या प्रतिनिधी समोर नष्ट करण्यात येईल  .  व यावर झालेला खर्च संबंधित ठेकेदाराकडुन वसुल करण्यात येईल . लेखापरीक्षणाच्या वेळी वरील बाबीवर कारवाई केल्याचे दिसुन येत नाही. करारनाम्याप्रमाणे औषधे नष्ट न करता ठेकेदारास परत करण्यात आली आहे व त्याच्या बदली परत साठा घेण्यात आलेला आहे . त्यामूळे अप्रमाणित औषधे ठेकेदार त्याचा कुठेही पुनर्वापर करु शकतो. तसेच खरेदीची किंमत ठेकेदाराकडुन वसुल न केल्यामुळे महानगरपालिकेचे रु .४६७५०/- (३४००० गोळ्या  1 x 10= 3400 x 13.75)  नुकसान झालेले आहे. करारनाम्याप्रमाणे ठेकेदारावर का कारवाई करण्यात आली नाही याचा खुलासा लेखापरीक्षणास करण्यात आलेला नाही.

# आरोग्य विभाग (पशुसंवर्धन)

**आक्षेप क्र.१७.०१ :- पशुधन पुस्तकांबाबत...**

महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र .१४८ अन्वये नमुना क्र .१२१ प्रमाणे पशुधन पुस्तक ठेवणे आवश्यक आहे . प्रतिवर्षी या पुस्तकात वार्षिक नोंदी करण्यात येवुन नवी खरेदी वा निर्लेखन नमुद करण्यात येते . विभागाने पशुधन पुस्तक सन २०१४-१५ चे लेखा परीक्षणास सादर करण्यात यावे असे अर्धसमासाव्दारे कळविण्यात आले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०५(२) व अनुसुची 'ड' प्रकरण ३ दोन मधील नियम ६(२) व ७ नुसार लेखापरीक्षणा करिता विभागाने संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देने अनिवार्य आहे. परंतु संबंधित वि भागाने याबाबत कार्यवाही केलेली नाही . पुर्तता करुन अनुपालन लेखापरीक्षणास सादर करावे.

# स्थानिक संस्था कर विभाग

**आक्षेप क्र.१८.१:- स्थानिक संस्था कर विभागाचे "पी" रजिस्टर बाबत...**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात दि .०१/०४/२०१० पासुन जकाती ऎवजी स्थानिक संस्था कर लागु करण्यात आलेला आहे . महानगरपालिका क्षेत्राचे निवडणुक प्रभागनिहाय २१ गट पाडण्यात आलेले असुन स्थानिक संस्था कर नोंदणीकृत व्यापारी संख्या २२५०३ असुन त्या व्यापा-य़ांची नोंदणी प्रमाणपत्रानुसार "पी" रजिस्टरला नोंद घेण्यात आली आहे.

'पी' रजिस्टर तपासताना नोंदणीकृत व्यापा-यांपैकी केवळ ६६५ व्यापा-यांनी सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात स्थानिक संस्था कराचा भरणा केल्याचे आढळुन येते . कराची भरणा न केलेल्या व्यापा-यांची संख्या २१८३८ असुन त्यापैकी ब-याच व्यापा-यांनी सन २०१०-११ ते सन २०१३-१४ या काळात स्थानिक संस्था कर भरणा केलेला आढळुन येतो . त्यापैकी काही व्यापा- यांची माहिती खालील प्रमाणे आहे.

| **व्यापाराचे नाव व पत्ता** | **Rc No. & effect of Rc** | **भरणा केल्याचे वर्ष** | **भरणा महिना** | **भरणा रक्कम रु.** |
|---|---|---|---|---|
| मे.मोहम्मदी इंटरप्रायजेस ताहेर एफ.कनोरखाता, बि.नं-९,३०२ फक्री कॉलनी, स्टेशन रोड, भाईंदर (प) | ००३/८०६/२०११-१२ | २०१०-११ | जुलै २०१० | ३०४८५३.०० |
| मे. शिला इंटरप्रायजेस शॉप/०४ मोतीनगर, जय अंबे माता रोड, भाईंदर (प) | ००३/८३०/२०११-१२ | २०१३-१४ | ऑक्टोंबर २०१३ | ४८५००/- |
| मे. एव्हग्रीन कंस्ट्रक्शन. राजकुमार पटेल, शॉप/३ चिरागनगर नं-०१, शिवसेना गल्ली भाईंदर (प) | ००३/८३४/२०१२-१३ | २०१३/१४ | डिसेंबर २०१३ ते मार्च २०१४ | १०३०३३/- |
| मे.जय जलाराम सेल्स एजन्सी/ एस १२ आंचलगिरी, १५० फुट, भाईंदर (प) | ०४/१०३/२०१० | २०१३-१४ | मे व ऑक्टोंबर २०१३ | ५३६९२/- |

वरील व्यापा-यांनी यापुर्वीच्या वर्षात स्थानिक संस्था कर भरल्याचे आढळुन येते . परंतु, सन २०१४-१५ मध्ये स्थानिक संस्था कर भरलेला आढळुन येत नाही. तसेच ज्या व्यापा-यांनी स्थानिक संस्था कर नोंदणी केलेली असुन देखील कित्येक वर्ष ते कराचा भरणा केलेला नाही ; याबाबत

विभागाने संबंधित व्यापा-यांवर काय कारवाई केली याचा लेखापरीक्षणाने खुलासा अपेक्षिला होता. खुलासा अप्राप्त आहे.

**आक्षेप क्र.१८.२:- मे.मोरिल एण्ड ग्रीनवुड प्रा.लि. यांच्या २०१४-१५ मधील स्थानिक संस्था कर निर्धारणेतील त्रुटी बाबत...**

मे.मोरील एण्ड ग्रीनवुड प्रा.लि.

नोंदणी क्र.१२/१९६७

कालावधी-०१/०४/२०१४ ते ३१/०३/२०१५

अ) सदरील व्यापाराची २०१४-१५ ची कर निर्धारण तपासली असता खालील प्रमाणे त्रुटी आढळुन आल्या.

| | |
|---|---|
| स्थानिक संस्था कर निर्धारणेप्रमाणे खरेदी | १,९०,५८,४११/- |
| स्थानिक संस्था कर वजाती | १,०७,१५,४२९/- |
| स्थानिक संस्था करासाठी पात्र असलेल्या मालाचे मुल्य | ८३,४२,९८२/- |
| निर्धारीत केल्याप्रमाणे स्थानिक संस्था कराचा दर २% व ३% प्रमाणे | १,६५,८४३/- |

लेखापरीक्षणानुसार करपात्र मुल्यावर खालील प्रमाणे कर निर्धारणा करणे आवश्यक आहे.

| | |
|---|---|
| लेखापरीक्षणाच्या वेळी सिमेंट खरेदी रक्कम रु.३९,७४,४००/- वर ३% दराप्रमाणे स्थानिक संस्था कराची रक्कम | १,१९,२३२/- |
| उर्वरित सिमेंट खरेदी रक्कम रु . ४३,६८,५८२/ वर २% दराप्रमाणे स्थानिक संस्था कराची रक्कम. | ८७,३७२/- |
| एकुण | २,०६,६०४/- |

| लेखापरीक्षणाप्रमाणे कर निर्धारणा | कर निर्धारणाप्रमाणे | फरक |
|---|---|---|
| रु. २,०६,६०४/- | रु. १,६५,८४३/- | रु. ४०,७६१/- |

वरील विवरणपत्राप्रमाणे कर निर्धारणेच्या वेळी संपुर्ण सिमेंट खरेदीवर लेखापरीक्षणानुसार कर निर्धारणा केलेली दिसुन येत नाही व त्यामुळे कर निर्धारणा रु .४०,४६१/- ने कमी झालेली आहे. तरी, याबाबत योग्य तो खुलासा लेखापरीक्षणास करण्यात यावा.

ब) स्थानिक संस्था कर नोंदणीकृत व्यापाराकडुन माल खरेदी केलेली वजाती रक्कम रु . १,०७,१५,४२९/- चा तपशिल पाहता अशा व्यापा-याचा स्थानिक कर नोंदणी क्रमांक, खरेदी मालाची

यादी व स्थानिक संस्था कर भरणा केल्याची खात्री करनिर्धारणाच्यावेळी केल्याचे आढळुन येत नाही. त्यामुळे वजाती
दिलेली रक्कम योग्य आहे की नाही हे लेखापरीक्षणात तपासता आले नाही. तरी, स्थानिक संस्था कर नोंदणीकृत व्यापाराकडुन खरेदी केलेल्या मालाबाबत वजाती रक्कमे करिता सदरील व्यापा-याने कर भरल्याची माहिती लेखापरीक्षणास सादर करणे बाबत दि.०९/१०/२०१७ रोजीच्या अर्धसमासाद्वारे कळविण्यात आले होते.

सदर माहिती अप्राप्त आहे.

**आक्षेप क्र.१८.३ :- मे.अक्षय ज्योती ऑप्टीकल्स यांच्या २०१४-१५ मधील स्थानिक संस्था कर निर्धारणेतील त्रुटी बाबत...**

**मे.अक्षय ज्योती ऑप्टीकल्स**

नोंदणी क्र.०२/८४६

कालावधी-०१/०४/२०१४ ते ३१/०३/२०१५

AO dt-२७/०८/२०१५

सदरील व्यापाराची २०१४-१५ ची कर निर्धारण तपासली असता एकुण खरेदी विक्री कर (Vat) विभागात दाखवलेल्या एकूण खरेदी प्रमाणे कर निर्धारणा केलेली आहे . व्यापाराने रिर्टन सोबत जोडलेल्या न फा आणि तोटा खात्याप्रमाणे एकुण खरेदी रक्कम रु .२,०५,५७०/- एवढी जास्त असल्याचे आढळुन येते याची माहिती खालील प्रमाणे.

| विक्री कर विभागात दाखविलेल्या एकूण खरेदी प्रमाणे कर निर्धारणा | | नफा तोटा खात्याच्या खरेदी प्रमाणे करावयाची निर्धारणा | |
|---|---|---|---|
| १८/०७/२०१४ | १८,९१,३००/- | खरेदी खाते | ६८,१७,००६/- |
| १८/१०/२०१४ | ७,२०,३४४/- | सेंट्रल सेल्स टॅक्स पेड | १,७९,०२०/- |
| १५/०१/२०१५ | २२,५४,८६७/- | वॅट | २६,५५०/- |
| ०९/०६/२०१५ | १९,५०,४८५/- | - | - |
| एकुण खरेदी | ६८,१७,००४/- | एकुण खरेदी | ७०,२२,५७६/- |
| स्थानिक संस्था कर वजाती | २६,८०,२११/- | स्थानिक संस्था कर वजाती | २६,८०,२११/- |
| कर निर्धारणा कर पात्र खरेदी | ४१,३६,७९५/- | कर निर्धारणा कर पात्र खरेदी | ४३,४२,३६५/- |
| २% प्रमाणे कर निर्धारणा | ८२,७३६/- | २% प्रमाणे कर निर्धारणा | ८६,८४७/- |

त्यामुळे ८६८४७ - ८२,७३६ = ४१११.३० ने कमी कर निर्धारणा झाल्याचे आढळुन येते . तसेच स्थानिक संस्था कर नोंदणीकृत व्यापाराकडुन माल खरेदी केलेली वजाती रक्कम रु .

२६,८०,२११/-चा तपशिल पाहता अशा व्यापा-याचा स्थानिक कर नोंदणी क्रमांक, खरेदी मालाची यादी व स्थानिक संस्था कर भरणा केल्याची खात्री करनिर्धारणाच्यावेळी केल्याचे आढळुन येत नाही . त्यामुळे वजाती दिलेली रक्कम योग्य आहे की नाही हे लेखापरीक्षणात तपासता आले नाही . तरी, स्थानिक संस्था कर नोंदणीकृत व्यापाराकडुन खरेदी केलेल्या मालाबाबत वजाती रक्कमे करिता सदरील व्यापा- याने कर भ रल्याची माहिती लेखापरीक्षणास सादर करणे बाबत दि .०९/१०/२०१७ रोजीच्या अर्धसमासाद्वारे कळविण्यात आले होते.

सदर माहिती अप्राप्त आहे

## आक्षेप क्र.१८.४:- मे.किशोर ऑप्टीक यांच्या २०१४-१५ मधील स्थानिक संस्था कर निर्धारणेतील त्रुटी बाबत...

**मे.किशोर ऑप्टीक**

नोंदणी क्र.०३४६

कालावधी-०१/०४/२०१४ ते ३१/०३/२०१५

सदरील व्यापा-याची २०१४-१५ ची एकुण खरेदी वरील कर निर्धारणा खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| एकुण खरेदी | ३२,७८,२४९/- |
| स्थानिक संस्था कर वजाती | १०,३०,९८९/- |
| कर निर्धारणा कर पात्र खरेदी | २२,४७,२६०/- |
| २% प्रमाणे कर निर्धारणा | ४४,९४५/- |

स्थानिक संस्था कर नोंदणीकृत व्यापाराकडुन माल खरेदी केलेली वजाती रक्कम रु. १०,३०,९८९/- चा तपशिल पाहता अशा व्यापा- याचा स्थानिक कर नोंदणी क्रमांक , खरेदी मालाची यादी व स्थानिक संस्था कर भरणा केल्याची खात्री करनिर्धारणाच्यावेळी केल्याचे आढळुन येत नाही. त्यामुळे वजाती दिलेली रक्कम योग्य आहे की नाही हे लेखापरीक्षणात तपासता आले नाही . तरी, स्थानिक संस्था कर नोंदणीकृत व्यापाराकडुन खरेदी केलेल्या मालाबाबत वजाती रक्कमे करिता सदरील व्यापा- याने कर भरल्याची माहिती लेखापरीक्षणास सादर करणे बाबत दि .०९/१०/२०१७ रोजीच्या अर्धसमासाद्वारे कळविण्यात आले होते.

सदर माहिती अप्राप्त आहे.

## आक्षेप क्र.१८.५:- मे.सागर इंड्स्ट्रीज यांच्या २०१४-१५ मधील स्थानिक संस्था कर निर्धारणेतील त्रुटी बाबत...

**मे. सागर इंडस्ट्रिज**

नोंदणी क्र.०५/११७

कालावधी-०१/०४/२०१४ ते ३१/०३/२०१५

Ao Dated-२६/०६/२०१७

सदरील व्यापा-याची २०१४-१५ ची एकुण खरेदी वरील कर निर्धारणा खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| एकुण खरेदी | ४,१५,९२,२९७/- |
| स्थानिक संस्था कर वजाती | २५,९४,४९२/- |
| कर निर्धारणा कर पात्र खरेदी | ३,८९,९७,८०५/- |
| २% प्रमाणे कर निर्धारणा | ७,७९,९५६/- |

स्थानिक संस्था कर नोंदणीकृत व्यापाराकडुन माल खरेदी केलेली वजाती रक्कम रु . २५,९४,४९२/- चा तपशिल पाहता अशा व्यापा- याचा स्थानिक कर नोंदणी क्रमांक , खरेदी मालाची यादी व स्थानिक संस्था कर भरणा केल्याची खात्री करनिर्धारणाच्यावेळी केल्याचे आढळुन येत नाही. त्यामुळे वजाती दिलेली रक्कम योग्य आहे की नाही हे लेखापरीक्षणात तपासता आले नाही . तरी, स्थानिक संस्था कर नोंदणीकृत व्यापाराकडुन खरेदी केलेल्या मालाबाबत वजाती रक्कमे करिता सदरील व्यापा- याने कर भरल्याची माहिती लेखापरीक्षणास सादर करणे बाबत दि .०९/१०/२०१७ रोजीच्या अर्धसमासाद्वारे कळविण्यात आले होते.

सदर माहिती अप्राप्त आहे.

## आक्षेप क्र.१८.६:- मे.निर्मल एक्सपोर्टस यांच्या २०१४-१५ मधील स्थानिक संस्था कर निर्धारणेतील त्रुटी बाबत...

**मे. निर्मल एक्सपोर्टस**

नोंदणी क्र.०५/८९

कालावधी-०१/०४/२०१४ ते ३१/०३/२०१५

सदरील व्यापा-याची २०१४-१५ ची एकुण खरेदी वरील कर निर्धारणा खालीलप्रमाणे आहे

| | |
|---|---|
| एकुण खरेदी | ६,९६,०१,६५५/- |
| स्थानिक संस्था कर वजाती | ५३,३२,९६५/- |
| कर निर्धारणा कर पात्र खरेदी | ६,४२,६८७/- |
| २% प्रमाणे कर निर्धारणा | १२,८५४/- |

स्थानिक संस्था कर नोंदणीकृत व्यापाराकडुन माल खरेदी केलेली वजाती रक्कम रु. ५३,३२,९६५/- चा तपशिल पाहता अशा व्यापा- याचा स्थानिक कर नोंदणी क्रमांक , खरेदी मालाची यादी व स्थानिक संस्था कर भरणा केल्याची खात्री करनिर्धारणाच्यावेळी केल्याचे आढळुन येत नाही. त्यामुळे वजाती दिलेली रक्कम योग्य आहे की नाही हे लेखापरीक्षणात तपासता आले नाही . तरी, स्थानिक संस्था कर नोंदणीकृत व्यापाराकडुन खरेदी केलेल्या मालाबाबत वजाती रक्कमे करिता सदरील व्यापा- याने कर भरल्याची माहिती लेखापरीक्षणास सादर करणे बाबत दि .०९/१०/२०१७ रोजीच्या अर्धसमासाद्वारे कळविण्यात आले होते.

सदर माहिती अप्राप्त आहे.

**आक्षेप क्र.१८.७:- मे.न्यु कामत टॉबेको कंपनी प्रा.लि. यांच्या २०१४-१५ मधील स्थानिक संस्था कर निर्धारणेतील त्रुटी बाबत..**

**मे.न्यु कामत टॉबेको कंपनी प्रा.लि**

नोंदणी क्र.२०/१६८

कालावधी-०१/०४/२०१४ ते ३१/०३/२०१५

सदरील व्यापाराची २०१४-१५ ची कर निर्धारण मुल्य तपासले असता एकुण खरेदी रक्कम रु.४३,५२,७५,१८३ वर कर निर्धारणा केलेली आहे . व्यापा-रांने रिर्टन सोबत जोडलेल्या नफा आणि तोटा खात्याप्रमाणे एकुण खरेदी रक्कम एवढी जास्त असल्याचे आढळुन येते याची माहिति खालील प्रमाणे.

| कर विभागात दाखविलेल्या एकूण खरेदी प्रमाणे स्थानिक संस्था कर निर्धारणा | | नफा तोटा खात्याच्या खरेदी प्रमाणे प्रत्यक्ष करावयाची स्थानिक संस्था कर निर्धारणा | |
|---|---|---|---|
| | | खरेदी खाते | ३९,८५,८७,४९८/- |
| | | सेंट्रल एक्साईज | ८,११,३१,३५४/- |
| एकुण खरेदी | ४३,५३,४२,०६१/- | एकुण खरेदी | ४७,९७,१८,८५२/- |
| स्थानिक संस्था कर वजाती | ६६,८७८/- | स्थानिक संस्था कर वजाती | ६६,८७८/- |
| कर निर्धारणा कर पात्र खरेदी | ४३,५२,७५,१८३ | कर निर्धारणा कर पात्र खरेदी | ४७,९६,५१,९७४ |
| २% प्रमाणे कर निर्धारणा | ८७,०५,५०३/- | २% प्रमाणे कर निर्धारणा | ९५,९३,०३९.५० |

त्यामुळे ९५,९३,०३९.५० - ८७,९३,१३८ = ८,८७,५३६.५० ने कमी कर निर्धारणा झाल्याचे आढळुन येते. तरी, कर निर्धारणेच्या वेळी नफा तोटा पत्रकाप्रमाणे खरेदी मुल्यात केंद्रीय उत्पादन शुल्काच्या रक्कमेचा अंतर्भाव करुन कर निर्धारणा केली असती तर करमुल्य रक्कम जास्त झाली

असती अशी लेखापरीक्षणाची धारणा आहे. तरी, याबाबत लेखापरीक्षणास खुलासा सादर करणे बाबत दि.०९/१०/२०१७ रोजीच्या अर्धसमासाद्वारे कळविण्यात आले होते.

सदर खुलासा अप्राप्त आहे.

**आक्षेप क्र.१८.८:- मे.मिनीपॅक यांच्या २०१४-१५ मधील स्थानिक संस्था कर निर्धारणेतील त्रुटी बाबत...**

**मे.मिनीपॅक**

नोंदणी क्र.२०/११७

कालावधी-०१/०४/२०१४ ते ३१/०३/२०१५

AO dt-२९/०६/२०१६

सदरील व्यापाराची २०१४-१५ ची कर निर्धारण तपासली असता एकुण खरेदी विक्री कर (Vat) विभागात दाखवलेल्या एकूण खरेदी प्रमाणे कर निर्धारणा केलेली आहे . व्यापाराने रिर्टन सोबत जोडलेल्या नफा आणि तोटा खात्याप्रमाणे एकुण खरेदी रक्कम रु .६,६८,६२,७६९.५७ कर निर्धारणे प्रमाणे जास्त असल्याचे आढळुन येते याची माहिती खालील प्रमाणे.

| **विक्री कर विभागात दाखविलेल्या एकूण खरेदी प्रमाणे कर निर्धारणा** | | **नफा तोटा खात्याच्या खरेदी प्रमाणे करावयाची निर्धारणा** | |
|---|---|---|---|
| एकुण खरेदी | ६,३४,५१,३८१/- | खरेदी खाते | ६,६८,६२,७६९.५७ |
| स्थानिक संस्था कर वजाती | ४६,७८,७४१/- | स्थानिक संस्था कर वजाती | ४६,७८,७४१/- |
| कर निर्धारणा कर पात्र खरेदी | ५८७७२६४० | कर निर्धारणा कर पात्र खरेदी | ६,२१,८४,०२८.५७ |

जर नफा तोटा खात्याच्या खरेदी प्रमाणे कर निर्धारणा केली असती तर कर निर्धारणा जास्त झाली असती. तसेच स्थानिक संस्था कर नोंदणीकृत व्यापाराकडुन माल खरेदी केलेली वजाती रक्कम रु. ४६,७८,७४१/- चा तपशिल पाहता अशा व्यापा-याचा स्थानिक कर नोंदणी क्रमांक, खरेदी मालाची यादी व स्थानिक संस्था कर भरणा केल्याची खात्री करनिर्धारणाच्यावेळी केल्याचे आढळुन येत नाही. त्यामुळे वजाती दिलेली रक्कम योग्य आहे की नाही हे लेखापरीक्षणात तपासता आले नाही. तरी, स्थानिक संस्था कर नोंदणीकृत व्यापाराकडुन खरेदी केलेल्या मालाबाबत वजाती रक्कमे करिता सदरील व्यापा- याने कर भरल्याची माहिती लेखापरीक्षणास सादर करणे बाबत दि.०९/१०/२०१७ रोजीच्या अर्धसमासाद्वारे कळविण्यात आले होते.

सदर माहिती अप्राप्त आहे.

**आक्षेप क्र.१८.९:- मे.अंबुजा सिमेंट यांच्या २०१४-१५ मधील स्थानिक संस्था कर निर्धारणेतील त्रुटीबाबत...**

**मे.अंबुजा सिमेंट**

नोंदणी क्र.२१/००१

कालावधी-०१/०४/२०१४ ते ३१/०३/२०१५

सदरील व्यापा-याची २०१४-१५ ची एकुण खरेदी वरील कर निर्धारणा खालीलप्रमाणे आहे

| | |
|---|---|
| एकुण खरेदी | ४०,६२,५४,७३४/- |
| कर निर्धारणा | १,२१,८७,६४२/- |
| कर भरणा | ८१,२५,०९५/- |
| फरकाची रक्कम | ४०,६२,५४७/- |
| व्याजाची रक्कम | ६,१५,७२०/- |

प्रस्तुत प्रकरणे मे . अंबुजा सिमेंट यांनी कर आकारणी रक्कम रु .१,२१,८७,६४२/- पैकी रु. ८१,२५,०९५/- इतक्या रक्कमेचा भरणा केलेला आहे . उर्वरीत रक्कम रु .४०,६२,५४७/- इतकी असुन त्यावरील व्याज आकारणी रु. ६,१५,७२०/- इतकी आहे.

तथापि महाराष्ट्र शासन राजपत्र दि.२५/१०/२०१० (ख) नुसार स्थानिक संस्था कर येणे असल्यचे आढळुन आल्यास अशा व्यापारी किंवा व्यक्ती या कालावधी साठी अशा व्यापांरावर किंवा व्यक्ती वर कर आकारणी करण्यात आलेली असेल अशा कालावधीच्या समाप्ती नंतरच्या पहिल्या तारखे पासुन कर आकारणिच्या अशा आदेशाच्या ता रखे पर्यंत प्रत्येक महिन्यास अशा स्थानिक संस्था कराच्या रक्कमेच्या २% रक्कम सरळ व्याजाच्या स्वरूपात देण्यास पात्र असेल परंतु व्याज आकारणी स्थानिक संस्था कराच्या एकुण रक्कमेपेक्षा अधिक असणार नाही.

उपरोक्त व्यापा-यांनी दि.१५/०६/२०१५ पर्यंत कर भरणा करावयाचा होता. तसेच कर निर्धारणा आदेश दि.०३/०६/२०१७ रोजीचे आहेत. व्यापारांनी धनादेश क्रमांक ९४३९३३ दि. ३१/०५/२०१७ अन्वये रु. ४०,६२,५४७/- इतक्या रक्कमेचा भरणा केलेला आहे . मात्र, व्यापा-यास दि .१५/०६/२०१५ ते ०३/०६/२०१७ या कालावधी करिता वरील शासन राजपत्रानुसार २% व्याज देय आहे. त्याची माहिती खालील प्रमाणे आहे.

स्थानिक संस्था कर उर्वरित रक्कम रु .४०,६२,५४७/- करिता दि . १५/०६/२०१५ ते दि . ०३/०६/२०१७ = २३ महिन्यांकरिता २% प्रमाणे व्याजाची रक्कम रु .१८,६८,७७२/- इतकी होत आहे. तरी, संबंधित व्यापा-याची कर निर्धारणा करताना वरील प्रमाणे व्याजाची गणना का करण्यात आली नाही याचा खुलासा लेखापरीक्षणास सादर करणे बाबत दि .०९/१०/२०१७ रोजीच्या अर्धसमासाद्वारे कळविण्यात आले होते.

सदर माहिती अप्राप्त आहे.

**आक्षेप क्र.१८.१०:- मे.केविन इंडस्ट्रीज यांच्या २०१४-१५ मधील स्थानिक संस्था कर निर्धारणेतील त्रुटी...**

**मे. केविन इंडस्ट्रीज**

कालावधी-०१/०४/२०१४ ते ३१/०३/२०१५

सदरील व्यापा-याची २०१४-१५ ची एकुण खरेदी वरील कर निर्धारणा खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| एकुण खरेदी | २,६०,९४,१९९/- |
| स्थानिक संस्था कर वजाती | १३,३४,२८२/- |
| कर निर्धारणा कर पात्र खरेदी | २,४७,५९,९१७/- |
| २% प्रमाणे कर निर्धारणा | ४,९५,१९८/- |

स्थानिक संस्था कर नोंदणीकृत व्यापाराकडुन माल खरेदी केलेली वजाती रक्कम रु. १३,३४,२८२/- चा तपशिल पाहता स्थानिक व्यापा-यांकडुन माल खरेदी केलेल्या सर्व व्यापा-यांकडुन स्थानिक कर नोंदणी क्रमांक , खरेदी मालाची यादी व स्थानिक संस्था कर भरणा केल्याची खात्री करनिर्धारणाच्यावेळी केल्याचे आढळुन येत नाही . मात्र, मे. केविन इंडस्ट्री ज यांनी स्थानिक व्यापारांकडुन खरेदी केलेल्या व्यापारांचा तपशिल खरेदी नोंदवही सत्यप्रती वरुन खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | Meet Enterprises | २४१८४५/- |
| २ | Ravi Steel | ३४३४३/- |
| ३ | Jyoti Plastic | ५८९६९/- |
| ४ | K.T.Corporation | ५९७३५/- |
| ५ | Uday Metal | १८८५८/- |
| ६ | SDG Hydraulic Eng. | १५६९३/- |
| ७ | Kishor Plastic | ३४८८०/- |
| ८ | Cash | १४००/- |
| | **Total** | **४,६५,७२३/-** |

उपरोक्त तपशिल पाहता मे . केविन इंडस्ट्रिज यांनी वरिल स्थानिक व्यापा- यांकडुन केवळ रु.४,६५,७२३/- इतक्या मालाची खरेदी केलेली आहे . तरी देखील विभागाने रु . १३,३४,२८२/- इतक्या रक्कमेची वजाती करुन रु . २,४७,५९,९१७/- इतक्या रक्कमेवर २% कर आकारणी रु . ४,९५,१९८/- केलेली आहे.

प्रत्यक्षात मे . केविन इंडस्ट्रिज यांनी वरिल स्थानिक व्यापा- यांकडुन केवळ रु .४,६५,७२३/- इतक्या मालाची खरेदी केली असल्याने विभागाने रु .४,६५,७२३/- इतक्या रक्कमेची वजाती करुन रु. २,५६,२८,४७६/- इतक्या रक्कमेवर २% कर आकारणी रु . ५,१२,५७०/- कर आकारणी करणे आवश्यक होते . यामुळे रु .१७,३७२/- इतकी कमी कर आकारणी केलेली आहे . तसेच सदर कर

रक्कमेवरील व्याज वसुल करणे आवश्यक आहे . तरी, वजातीची रक्कम इतकी जास्त का घेण्यात आली याबाबत योग्य तो खुलासा लेखापरीक्षणास सादर करणे बाबत दि .०९/१०/२०१७ रोजीच्या अर्धसमासाद्वारे कळविण्यात आले होते.

सदर खुलासा अप्राप्त आहे.

# भांडार विभाग

**आक्षेप क्र.१९.१ :- भांडार विभागाचे लेखे लेखापरीक्षणास सादर करणेबाबत...**

सन २०१४-१५ या वित्तीय वर्षामधील भांडार विभागातील प्रस्ताव तरतुद नोंदवही , कार्यादेश रजिस्टर, खरेदी केलेल्या साहित्य (वस्तुच्या) साठा नोंद वही, माल मिळाल्यासंबंधीचे चलन व विभागात साहित्य वितरण केल्याच्या तपशिलाचे मागणीपत्र इ . अभिलेख भांडार विभागाकाडुन दि.१८/०९/२०१७ रोजीच्या अर्धसमासादवारे लेखापरीक्षणा करिता मागविला होता . परंतु विभागाने वरील अभिलेख लेखापरीक्षणास उपलब्ध करुन दिलेला नाही . महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०५(२) व अनुसुची 'ड' प्रकरण ३ दोन मधील नियम ६(२) व ७ नुसार लेखापरीक्षणा करिता विभागाने संपुर्ण माहिती उपलब्ध करुन देणे अ निवार्य आहे . त्यामुळे उपरोक्त अभिलेखाचे लेखापरीक्षण करता आले नाही.

# उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग

**आक्षेप क्र.२०.१:-उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागात वाहनांवर होणा-या अनावश्यक खर्चाबाबत....**

उद्यान व वृक्षप्राधिकरण विभागामार्फत झाडे लागवडी करिता खड्डे मारणे , लाल माती व शेत खत टाकणे, पिंजरे लावणे, झाड्यांच्या फांदया छाटणी करणे व उचलणे , कामगारांची ने-आण करणे व पाणी मारणे अशी कामे केली जातात.

वरील कामाकरीता विभागाकडे MH04/B-1114 हे वाहन (ट्रॅक्टर) उपलब्ध आहे. तसेच झाडे छाटणी करीता हायड्रॉलिक शिडी MH04/FD-7527 देखील कार्यरत आहे. असे असताना देखील विभागाने उपरोक्त कामाकरीता बोलेरो जीप MH04/FD-5590 भाडे तत्त्वावर घेण्यात आल्याचे निदर्शनास येते.

यामुळे ट्रॅक्टर व हायड्रॉलिक शिडी वरील कामाकरीता उपलब्ध असताना देखील त्याच कामाकरीता बोलेरो जिप भाडे तत्त्वावर घेणे अनावश्यक वाटते . विशेषत: भाईंदर (प) विभागाचे भौगोलिक क्षेत्र सुमारे १० किलोमीटर परिसरात व्यापले असताना प्रति दिन ८० किमी. वाहन चालण्याची शक्यता वाटत नाही. तरी देखील सदर वाहन प्रति दिन ८० कि.मी. प्रमाणे भाडे तत्त्वावर दिले आहे.

सदर बोलेरो जिप भाडे तत्त्वावर घे ण्याच्या कामाबाबत झालेल्या अनावश्यक खर्चाबाबत खुलासा सादर करण्यात आलेला नाही.

**आक्षेप क्र.२०.२:- समुद्रफळ झाडांच्या ज्यादा खरेदीबाबत...**

वृक्ष प्राधिकरण मिरा भाईंदर महानगरपालिका भाईंदर (प) विभागातील साठा रजिस्टर नमुना नं-११६ चे लेखापरीक्षण करताना खालील प्रमाणे त्रुटी आढळुन आली.

१) कार्यादेश क्र./वृ.प्रा/३५३/२०१४-१५ दि.०६/०९/२०१४ अनुसार Barintonia hurtensis (समुद्रफळ) रु.८२४ दराप्रमाणे ५०० नग एकूण रक्कम ४१२००० रोपे पुरविण्यासाठी आदेश देण्यात आले होते. त्याप्रमाणे ठेकेदाराने एकुण ५०० नग पुरवठा करण्यात आलेली आहेत.

| अ.क्र | वृक्षारोपण करण्यात आलेली ठिकाणे | झाडांची संख्या |
|---|---|---|
| १ | इंद्रलोक ते गोल्डन नेस पोलिस चौकी रोड | २५४ |
| २ | नवघर जुने तलाव, आत्माराम पाटील तलाव उद्यान | १६ |
| ३ | मनपा गोडदेव शाळा (पुर्व) | १० |
| ४ | बदली साठी ठेवण्यात आलेली झाडे | २० |
| | **एकुण** | **३००** |
| | **शिल्लक झाडे** | **२००** |

उपरोक्त तपशिल पाहता विभागाच्या मागणी नुसार पुरवठादाराने एकुण ५०० झाडे पुरवठा केलेली आहेत. मात्र, त्यापैकी केवळ २८० झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले असुन २० झाडे बदली साठी ठेवण्यात आलेली आहेत. यामुळे ५०० झाडे मागविण्याची आवश्यकता नसल्याचे दिसुन येते . पर्यायाने, रु.८२४ दराप्रमाणे २२० झाडांची रु.१,८१,२८०/- रक्कम अनावश्यकरित्या खर्च केल्याचे निदर्शनास येते. वास्तविक झाडे मागणी करणे पुर्वी झाडांच्या आवश्यकतेकरता सर्वेक्षण करणे गरजेचे असताना ते न केल्यानेच जास्तीची रक्कम गुंतुन राहिल्याचे दिसुन येते . तसेच २२० झाडे विनारोपण वाया गेल्याचे दिसून येते . याबाबत लेखापरीक्षणास खुलासा अप्राप्त आहे.

**आक्षेप क्र.२०.३ :- बॉटल पाम झाडांच्या खरेदीबाबत...**

उद्यान व वृक्ष प्राधिकरण मिरा भाईंदर महानगरपालिका भाईंदर (प) विभागातील साठा रजिस्टर नमुना नं-११६ चे लेखापरीक्षण करताना खालील प्रमाणे त्रुटी आढळुन आली.

कार्यादेश क्र./वृ.प्रा/३५२/२०१४-१५ दि.०६/०९/२०१४ अनुसार Palm Varities, Bottle Palm (१६ से.मी x १६ से.मी पोलिथीन बॅग, ६-८ फुट उंचीची झाडे)

रु.१२९८/- दराप्रमाणे ५०० नग एकूण रक्कम ६,४९,०००/- रोपे पुरविण्यासाठी आदेश देण्यात आले होते. त्याप्रमाणे ठेकेदाराने एकुण ५०० नग पुरवठा करण्यात आलेली आहेत.

| अ.क्र | वृक्षारोपण करण्यात आलेली ठिकाणे | झाडांची संख्या |
|---|---|---|
| १ | बी.पी रोड गोडदेव नाका ते भाईंदर रेल्वे स्टेशन (पुर्व) | १४८ |
| २ | नेताजी सुभाषचंद्र बोस मैदान येथे नव्याने बांधण्यात आलेल्या गटाराच्या बाजुला व दुभाजकात | ७१ |
| ३ | न्यु गोल्डन नेस फेस क्र.१३, १०० फुट रोड, भाईंदर (पुर्व) | ४५ |
| ४ | भाइंदर (पुर्व), इंद्रलोक फेस-३ | ४३ |
| ५ | राई गाव मराठी शाळा भाईंदर (प) | ०५ |
| ६ | टेंभा हॉस्पीटल भाईंदर (प) | १८ |
| ७ | मॅक्सेस मॉल रोड भाईंदर (प) | ३० |
| ८ | श्री निधी हॉटेल रोड, भाईंदर (प) | ०३ |
